TIGHT BINDING BOOK

# TEXT FLY WITHIN THE BOOK ONLY

UNIVERSAL
LIBRARY
OU_192148
UNIVERSAL
LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M910.9 / M21N Accession No. M4203

Author महादेवशास्त्री जोशी.

Title नीलमाधव. 1954

This book should be returned on or before the date last marked below.

कथाकल्पलता : : : २

# नीलमाधव

लेखक

पं. महादेवशास्त्री जोशी

आवृत्ति पहिली

[१९५४]

ज्ञानराज प्रकाशन, पुणें २.

मूल्य सव्वा रुपया

प्रकाशक :
सौ. सुधा महादेव जोशी
ज्ञानराज प्रकाशनाकरितां
४२१ शनिवार पेठ, पुणें २

•

अंतर्गत सजावट :
भय्यासाहेब ओंकार
गंगाधर ताटके

•

मुखपृष्ठ :
दीनानाथ दलाल

•

Checked 1963

सर्व हक्क लेखकाधीन

•

मुद्रक :
श्रीपाद जगन्नाथ गानू
राजगुरु प्रेस
४०५ नारायण पेठ, पुणें २

## प्रथमारंभीं—

कथाकल्पलता या मालेचें हें दुसरें पुष्प आहे. ‘ दिंडीरवन ’ या पहिल्या पुष्पाचें महाराष्ट्रांतल्या कुमार-कुमारिकांनीं जें सहर्ष स्वागत केलें, त्यामुळेंच हें पुष्प इतक्या लवकर प्रकाशित करतां आलें.

या पुस्तकांतल्या कथानाहि सांस्कृतिक कथाच म्हटलें पाहिजे. भारतांतल्या सात महान् क्षेत्रांच्या उत्पत्तीच्या घटना त्या सांगत आहेत. प्रत्येक कथेंत भारतीय संस्कृतीचा एखादा तरी पैलू चमकतांना दिसतो.


याच्या पुढच्या पुष्पांत दक्षिणेंतील सुप्रसिद्ध क्षेत्रांसंबधींच्या उद्बोधक कथा प्रकाशित करायचें ठरवलें आहे.

पुणें
गणेशचतुर्थी
शके १८७६

महादेवशास्त्री
जोशी

# नीलमाधव

पूर्व समुद्राच्या तीरावरची जगन्नाथपुरी हें भारताचें मोक्षदायक क्षेत्र आहे. हें स्थान उडीसाच्या राज्यांत येतें. कलकत्ता, खडगपूर ते पुरी असा तिथें जाण्याचा रेल्वेरस्ता आहे. या ठिकाणीं मंदिराच्या महाद्वारासमोर काळया पाषाणाचा जो एक ३५ फूट उंच स्तंभ आहे, तो इथल्या जगन्नाथ-मंदिराचा पूर्व प्रतिनिधि होय. चोल नरपतीनें इ. स. १०३० मध्यें हा स्तंभ उभारला आहे. जगन्नाथाचें मंदिर बाराव्या शतकाच्या सुरवातीस इंद्रद्युम्न राजानें बांधलें आहे.



जगन्नाथाचा रथ

मंदिराच्या महाद्वारावर दोन विशाल सिंहप्रतिमा आहेत. मंदिराला एकाच्या आंत एक असे तीन प्राकार आहेत. प्राकाराभोंवतीं तट उभारलेले आहेत. या प्राकारांत निरनिराळया देवतांचीं १२० मंदिरें आहेत. या सर्वांत जगन्नाथाचें मंदिर विशाल आहे. वीस फूट उंचीच्या एका टेकडीवर तें उभारलेलें आहे. या टेकडीला नीलगिरि असे नांव आहे. उडीसांतल्या मंदिरांची रचना इतर प्रांतांतल्या रचनेहून भिन्न

आहे. या देवळांना खांब नसतात. आंतल्या भिंतीवर विशेषशी कारागिरी नसते. फक्त बाहेरचा भाग तेवढा खूप सुंदर आणि शोभिवंत केलेला असतो.

जगन्नाथाच्या मंदिराचे चार विभाग पडतात. गाभाऱ्याला ते देऊळ म्हणतात. त्याच्यापुढें १२० फूट उंचीचा जो चौक आहे, त्याला जगमोहन म्हणतात. त्यापुढें नटमंदिर आहे आणि त्याच्याहिपुढें भोगमंडप आहे. भोगमंडपांत हजारों मूर्ती कोरलेल्या आहेत.

हें मंदिर सर्वांना खुलें आहे. इथें स्पृश्यास्पृश्य भेद नाहीं. मंदिर-प्रवेशाबद्दल करहि नाहीं. इथें चंदनतलाव नांवाचें एक सरोवर आहे. त्यांत स्नान करून लाल वस्त्र नेसायचें आणि सूर्याला अर्घ्यप्रदान करून मग जगन्नाथाच्या दर्शनाला जायचें. मंदिरांत एका रत्नवेदीवर जगन्नाथ उभा आहे. त्याच्या उजव्या अंगाला त्याची बहीण सुभद्रा आहे आणि तिच्या उजव्या हाताला बलराम आहे. तीन्ही मूर्ती सहा सहा फूट उंचीच्या असून लांकडाच्या बनवलेल्या आहेत. जगन्नाथाच्या मूर्तीचा रंग सांवळा आहे. माथां मुकुट, कानीं कुंडलें आणि ललाटीं हिरा चमकतो आहे. जवळच सहा फूट व्यासाचें तांबडें सुदर्शन-चक्र आहे.

जगन्नाथाची रथयात्रा आषाढ शुद्ध द्वितीयेला होते. तिथें प्रचंड यात्रा जमते ती याच वेळीं. हा रथ पंचेचाळीस फूट उंचीचा असून फार भव्य आहे. पुरीहून एक मैल दूर असलेल्या जनकपुरापर्यंत हा रथ ओढीत नेतात. बलराम आणि सुभद्रा यांचेहि स्वतंत्र रथ आहेत.

जगन्नाथाचा महाप्रसाद म्हणजे भात. हा मोठमोठ्या मातीच्या हंड्यात शिजवून तो लक्ष्मीबाजारांत नेऊन वांटतात. कित्येक यात्रेकरू या ठिकाणीं सर्वस्वाचें दान करतात. याच जगन्नाथाचें प्राचीन नांव "नीलमाधव" असें होतें. त्याची आणि हें मंदिर निर्माण करणाऱ्या इंद्रद्युम्न राजाची कथा पुढें दिली आहे.

* * *

आषाढ शुद्ध द्वितीयेचा दिवस आहे. आज जगन्नाथाची रथ-यात्रा आहे. त्यासाठीं भरतखंडाच्या साती दिशांतून अनेक भक्त-भाविकांची आणि यात्रिकांची पूर्व समुद्राच्या तीरावरच्या पुरीकडे रीघ लागलेली आहे. पुरी म्हणजे सात मोक्षदायक पुऱ्यांपैकीं एक पुरी. एक महत्त्वाचें यात्रास्थान. तिथें कोणी स्वार्थासाठीं कामना धरून आले आहेत, तर कोणी परमार्थासाठीं निष्काम होऊन आले आहेत. बाल, वृद्ध आणि तरुण. स्त्री आणि पुरुष. असंख्य जन-समुदाय जगन्नाथाच्या मंदिरासमोर आणि सभोंवतीं गोळा झाला आहे.

वाद्यें वाजत आहेत. सनयासूर वातावरण धुंद करीत आहेत. ब्राह्मणांचा मंत्रघोष उठावत आहे. रंगीबेरंगी पुष्पहार घमघमत आहेत. धूपदीप जळत आहेत. नाना भाषांचे स्वर आणि शब्द एकमेकांत मिसळत आहेत. घंटा घणघणत आहेत. मंदिरांत शिर-तांनाहि गर्दी आणि मंदिरांतून बाहेर पडतांनाहि गर्दी. पलीकडे पूर्व सागराला भरती आणि मंदिराच्या प्राकारांत मानवसागरालाहि भरती.

याच भरतीची एक लाट बनून तुम्हीहि आंत शिरा. माणसांच्या लोंढ्याबरोबर पुढें पुढें लोटत चला. मंदिराच्या गाभाऱ्यापर्यंत जा आणि शक्य असल्यास तिथें उभें राहून गाभाऱ्यांत दृष्टि टाका. समोरचा देव पहा. पहिल्या क्षणीं तुमच्या कल्पनेला चांगलाच धक्का बसेल. सुरेख साजिरी श्रीमूर्त पहायला मिळेल या आकांक्षेनें तुम्ही तिथें गेलेले असाल. पण........

तुम्हांला तिथें काय दिसेल? एक लांकडाचा ओंडका. त्याला ना हात ना पाय. वरच्या बाजूला कसा तरी ओबड धोबड चेहरा

बनवलेला अन् त्याला बटबटीत डोळे. पाहिल्यावर प्रेम तर उत्पन्न होऊंच नये ; उलट मनानें माघारीं फिरावें. एवढी दीर्घ आणि कष्टाची यात्रा करून हेंच का ध्यान पहायचें, असें वाटावें. साऱ्या उत्साहावर विरजण पडावें. वृत्तींचा हिरमोड व्हावा. पण तुम्ही दर्शन करायचें तें याच ओंडक्याचें. याच्याचपुढें माथा नमवायचा. यालाच पूजा-प्रार्थनेसह भक्तिभाव अर्पायचा. मागुणिदास कवि तुम्हांला सांगत आहे कीं—

“ पद अंगुलि नाइ हात
दारुब्रह्म जगन्नाथ ”

जगन्नाथ तो हाच. हें दारुब्रह्म आहे. दारु म्हणजे लांकडाचा ओंडका; त्यांतून प्रगटलेलें हें परब्रह्म भक्तजनांच्या उद्धारासाठीं बौद्धरूप घेऊन शतकानुशतकें उभें आहे.

हा जगन्नाथ इथें कुठून आला, कसा आला, अशा प्रकारें विरूप आणि अंगहीन कां झाला, याचा इतिहास तुम्हांला ऐकायचा आहे का ? ठीक आहे. सावचित्त होऊन श्रवण करा.

त्या काळीं या पुरीवर इंद्रद्युम्न नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याची ही राजधानी सुंदर होती, समृद्ध होती. समुद्राच्या तीरावर वसलेली असल्यामुळें तिला एक आगळें वैभव प्राप्त झालें होतें. त्या नगरींत एकच उणीव होती. तिच्या सुरेखपणाला कळा चढवील, असें एखादें उंच, विशाल असें देवालय तिथें नव्हतें. लोकांच्या श्रद्धेला आणि भक्तीला विषय होईल असें एखादें स्थान नव्हतें. प्राणावांचून कुडी तशी देवालयावांचून ती नगरी ओकी, उदास वाटत होती.

राजानें ती उणीव दूर करायचें ठरवलें. नगराच्या ऐन मध्यभागीं त्यानें देवालयासाठीं जागा आंखली. नगरांतल्या मजुरांना, बेलदारांना, कारागिरांना हुकूम सुटले. गाड्या भरभरून दगड येऊन पडूं लागले. गवंड्यांच्या छिन्न्या हातोड्या सुरू झाल्या. एका सुमुहूर्तावर मंदिराची पायाभरणी होऊन नारळ फुटला. मंदिर चहूं अंगीं दिशींमाशीं वर चढूं लागलें. सभामंडप झाला. गर्भागार तयार झालें. त्यावर लहानमोठे बाळसेदार कळस चढूं लागले. प्रत्येक दिवशीं नवी शोभा, नवे अलंकार. नगरांतले प्रजाजन पहातां पहातां खूष झाले. राजाला तर त्या मंदिराचें वेडच लागलें. जागृतींत मंदिर आणि स्वप्नांतहि मंदिरच. मंदिराच्या रचनेचे नवे नवे साक्षात्कार त्याला स्वप्नांत होऊं लागले आणि प्रत्यक्षांत तो तशा तशा सुधारणा घडवून आणूं लागला.

एके दिवशीं एक प्रवासी गृहस्थ पुरीला आला. त्यानें तें मंदिर पाहिलें. त्याला तें अत्यंत आवडलें. मोठ्या आदरानें त्यानें इंद्रद्युम्न राजाची भेट घेतली.

" महाराज, आपणांस शतशः धन्यवाद ! आपल्या रसिकतेचा गौरव करावा तेवढा थोडाच होईल ! केवढं कलापूर्ण मंदिर उभारलंत तुम्हीं ! मी अनेक देश हिंडलों ; पण असं वैभवशाली मंदिर पाहिलं नाहीं. आपण कोणत्या देवतेची मूर्ति या मंदिरांत स्थापणार आहांत ? "

आपली ती प्रशंसा ऐकून राजाची छाती विस्तारली. त्यानें म्हटलें.

" मी मंदिराच्या उभारणींतच तूर्त सगळं लक्ष घातलं आहे. त्यावर एकदां कळस चढला कीं मग मूर्तीची विचारणा. कोणताहि देव माझ्या या मंदिरांत आनंदानें रहायला येईल."

" महाराज, आपण काय विचार करायचा तो करा. पण मी माझा एक विचार आपल्या कानीं घालतों. या मंदिरांत एकच देव रहायला योग्य आहे अन् तो म्हणजे नीलमाधव!"

" नीलमाधव? हा कुठला देव?"

" हा नीलाचलावर सांप्रत आहे. तिथल्या शबरांच्या वस्तींत विश्वावसु नांवाचा एक फासेपारधी शबर राहतो. त्याच्यापाशीं ती मूर्ति आहे. इंद्रनील मण्याची घडवलेली आणि प्रसन्न-सुंदर. त्यानें ती वस्तीपासून दूर अशा एका खोऱ्यांत गुप्तपणें ठेवलेली आहे. सुदैवानेंच मला ती पहायला मिळाली. इतकी सुबक आणि सौम्य तेजाची पखरण करणारी मूर्ति उभ्या जगांत विरळा! ती मूर्ति आणून आपण या मंदिरांत बसवलीत तर तो मणिकांचनयोग होईल. मूर्तीला साजेसं मंदिर आणि मंदिराला साजेशी मूर्ति! महाराज, हें आपल्या हातून घडलं तर आपण धन्य व्हाल!"

एवढें बोलून तो प्रवासी गृहस्थ निघून गेला. राजाच्या मनाला नवा छंद लागला. केवळ वर्णनावरूनच तो नीलमाधव त्याच्या चित्तांत ठसला. त्यानें ठरवलें कीं, ' तीच मूर्ति आणायची. तिचीच स्थापना करायची. त्यामुळें माझी कीर्ति दिगंत पसरेल. फार मोठा पुरुषार्थ होईल. त्या मूर्तीचा ठावठिकाण लागला म्हणजे बस्स आहे. मग त्या शबरांची माझ्यापुढें काय कथा!........'

इंद्रद्युम्नानें लगेच कांहीं चाणाक्ष असे दूत नीलाचलावर पाठवले. सगळे आपापल्या परी तो डोंगर चाळूं लागले. दरेदरकुटे शोधूं लागले. पण कोणालाच नीलमाधव गवसला नाहीं. ते सगळे निराश मनानें परत फिरले.

पण त्यांतच विद्यापति नांवाचा एक दूत होता. तो मात्र चिकाटीनें तिथेंच राहिला. त्यानें सरळ निषादांच्या वस्तींत प्रवेश केला. चौकशी करीत करीत तो विश्वावसूच्या घरीं दाखल झाला. नीलमाधव त्याच्याच ताब्यांत होता. तो रोज पहांटे उठून कोणाला कळूं न देतां नीलमाधवाच्या घळींत जाई, तिथें त्याची भक्तिभावें पूजा करी अन् परत येतांना पशुपक्ष्यांची शिकार मारून दुपारीं घरीं येई.

विद्यापति घरीं आला त्या वेळीं तो त्याच कामगिरीवर गेलेला होता. घरांत फक्त त्याची कन्या होती. तिनें त्याचें स्वागत केलें, बसायला आसन दिलें आणि उपहारासाठीं घरांतलीं रानफळें त्याच्या-पुढें ठेवलीं.

त्या मुलीला पाहून विद्यापतीचा जीव खूष झाला. त्याचा सत्कार करतांना तिची जी धांदल उडाली ती त्याला फारच आवडली. रंगानें काळी पण तरतरीत अन् सडपातळ अशी ती मुलगी होती. डोळे कसे काळेभोर अन् वाटोळे. केसांची रास तर तिच्या मानेला पेलतच नव्हती. तिच्या सांवळ्या तनुलतेवर अशी कांहीं कांति विलसत होती कीं, जणुं कोण्या कारागिरानें इंद्रनील रत्नाची मूर्ति घडवून मग तिच्यांत प्राण घातला असें वाटावें. कां कोण जाणे! पण तिच्याकडे पाहून विद्यापतीला वाटलें कीं, ही साधी, भोळी, इंद्रनीळी मुलगी आपलें काम साधून देईल.

विद्यापति नगरांत रहाणारा; तेव्हां त्याच्यापाशीं नागरी शिष्टाचार भरपूर होते. शिवाय तो तरुण, बहुश्रुत आणि बोलकाहि होता. थोड्याश्याच संभाषणानें तो त्या शबरकन्येला आवडूं लागला. असा शहाणा, देखणा पाहुणा आपल्या घरीं आल्याबद्दल तिला मोठा अभिमान वाटला. दुपारीं बाप घरीं आल्यावर तिनें त्या दोघांची ओळख करून दिली. बापाला गळ घालून तिनें विद्यापतीला आपल्या घरीं राहवून घेतलें. तो राहिला; पण आपलें इंगित मात्र त्यानें विश्वावसूला कळूं दिलें नाहीं.

अशा स्थितींत चार, आठ दिवस निघून गेले. विद्यापति आणि शबरकन्या यांचा परिचय दाट झाला. त्यांच्या बोलण्याचालण्यांतला संकोच मावळून तिथें एक प्रकारचा विश्वास निर्माण झाला. विद्यापतीनें मोठ्या चातुर्यानें नीलमाधवाबद्दल सगळी माहिती तिच्याकडून काढून घेतली. मग तो तिला म्हणाला.

" तुमच्या घरच्या या सुंदर देवाचं तूं मला एकदासुद्धा दर्शन घडवणार नाहींस का ? "

" मी काय करूं ? माझ्या हातांत नाहीं तें. वडील या बाबतींत माझं ऐकायचे नाहींत. "

" सुंदर, शहाणी अन् लाडकी मुलगी. बाप तिचं ऐकणार नाहीं असं कधीं तरी होईल का ? त्यापेक्षां तुझ्याच मनांत नाहीं असं सांग कीं ! "

शबरकन्येला वाईट वाटलें. तिनें मान खालीं घातली. आपली मात्रा लागू पडत चालली आहे असं पाहून विद्यापति पुन्हां म्हणाला.

" तूं माझ्या घरीं आली असतीस तर मी तुझ्यापासून काहींहि

लपवून ठेवलं नसतं. तूं नुसतं दाखवतेस ; पण तुझं माझ्यावर खरं प्रेमच नाहीं."

विद्यापतीच्या या बोलण्यानें ती आणखी कष्टी झाली आणि त्याच्यापुढून उठून चालती झाली. तिला वाटलें कीं, आपल्या प्रेमाची साक्ष याला पटवलीच पाहिजे. तिनें त्या रात्रीं बापाला गळ घातली. विश्वावसूनें प्रथम आढेवेढे घेतले. पण मुलीच्या हट्टापुढें त्याला नमावें लागलें. पहांटे उठून तो विद्यापतीला म्हणाला.

"तुला मी नीलमाधवाच्या दर्शनासाठीं नेतों. पण एक अट आहे."

"कोणती अट ?" विद्यापतीनें सहर्ष विचारलें.

"मी तुझे डोळे बांधून तुला माझ्याबरोबर नेईन अन् देवापार्शी पोंचल्यावर ते सोडीन."

विद्यापति क्षणभरच विचारांत पडला. तो धूर्तपणांत विश्वावसूला उजवा होता. त्यानें काहीं तरी निर्णय ठरवून त्या गोष्टीला कबुली दिली. विश्वावसूनें लगेच त्याचे डोळे बांधले. विद्यापति डोळे असून आंधळा झाला आणि शबराच्या खांद्यावर हात ठेवून मार्ग चालूं लागला. पण तो चालतां



विद्यापतीचा डोळे बांधून प्रवास

चालतां एका हातानें आपल्या झोळींतल्या मोहऱ्या पेरीत चालला आहे हें कांहीं विश्वावसूच्या लक्षांत आलें नाहीं.

नीलमाधवाच्या समोर येतांच विश्वावसूनें त्याचे डोळे सोडले. ती मूर्ति पाहून विद्यापति हुरळून गेला. पण आपला हर्ष चेहऱ्यावर न दाखवितां त्यानें त्या मूर्तीचे अवयव, तिची मागची पुढची बाजू, तिथल्या सगळ्या खाणाखुणा हें सगळें बारकाईनें पाहून घेतलें. ही मूर्ति खरोखरच आपल्या राजधानीचें वैभव वाढवील असें त्याला वाटलें. तो जेव्हां सगळ्या गोष्टी तीक्ष्ण दृष्टीनें पाहतो असें दिसलें तेव्हां विश्वावसूला त्याच्याविषयीं चांगलाच संशय आला. मुलीच्या आग्रहाला बळी पडून आपण याला इथें आणलें तो मूर्खपणाच झाला असें त्याला वाटलें.

झटकन् त्यानें त्याचा हात पकडला. पुनश्च त्याचे डोळे बांधले. आणि त्याला घरीं आणून जवळच्या एका गुहेंत कोंडून घातलें. तो आपल्या मुलीवरहि खूपच रागावला. पण त्या मुलीचें विद्यापतीवर प्रेम जडलें होतें. तिनें त्याला कोंडून ठेवलें होतें ती जागा शोधून काढली आणि प्रथम त्याला अन्नपाणी नेऊन दिलें. विद्यापतीनें पुन्हा तिला गळ घातली आणि एक दिवस स्वतःची सुटका करून घेतली.

मग सरळ राजधानींत येऊन त्यानें घडलेली सर्व हकीगत राजाच्या कानीं घातली. इंद्रद्युम्न राजाला तें ऐकून स्वर्ग ठेंगणा वाटला. त्यानें विद्यापतीच्या हाताखालीं लांकूडतोड्यांची एक तुकडी देऊन त्याला ताबडतोब ती मूर्ति आणण्यासाठीं रवाना केलें. विद्यापति पुन्हा नीलाचलावर गेला. डोळे बांधलेल्या स्थितींत

तो ज्या वाटेनें नीलमाधवाकडे गेला होता, त्या वाटेच्या कडेनें त्यानें पेरलेल्या मोहऱ्यांचीं लहान लहान झाडें उगवलीं होतीं. त्यांच्या अनुरोधानें तो वाट न चुकतां नीलमाधवाच्या घळींत पोंचला. वाटेनें जातांना तो आपल्या मानसन्मानाचीं स्वप्नें जागेपणींच पहात होता. ती मूर्ति राजधानींत पोंचतांच त्याचा गगनभेदी जयजयकार होणार होता. राजदरबारांत त्याला असामान्य महत्त्व मिळणार होतें. पण—

तें भाग्य विद्यापतीच्या दैवांत लिहिलेलें नव्हतें. तिथें जाऊन पहातो तर त्या घळींत नीलमाधव नव्हता. ती मूर्ति एकाएकीं अदृश्य झाली होती. त्यानें आजूबाजूचा सगळा डोंगर धांडोळला; पण व्यर्थ! देवानेंच जिथें लपायचें ठरवलें तिथें माणूस काय त्याला शोधून काढील! हिंपुटी होऊन विद्यापति परतला. खालच्या मानेनें त्यानें राजाला सगळा प्रकार सांगितला. राजासुद्धा कल्पनेच्या आभाळांत वावरत होता तो एकदम खालीं आला. त्याच्या सगळ्या कळा उतरल्या. अन्न–पाणी न घेतां त्या दिवशीं तो अंथरुणावर पडला. पहाटेच्या वेळीं नीलमाधव त्याच्या स्वप्नांत येऊन कठोर वाणीनें म्हणाला.

“ राजा, तुला अहंकार झाला होता. तो शबर माझा श्रद्धाळु भक्त आहे. तूं मला त्याच्याकडून छिनावून आणणार होतास. भक्तीसाठीं नव्हे; तर केवळ मोठेपणासाठीं. मला असला गर्व रुचत नाहीं. म्हणून मी अदृश्य झालों. तुला जर खरीखुरी माझी आवडी असेल तर शंभर अश्वमेध कर. म्हणजे मी तुझ्या राज्यांत प्रगट होईन. मात्र तो इंद्रनीळ मूर्तीच्या रूपानें नव्हे; तर एका

चंदनी ओंडक्याच्या रूपानें. त्यावर पद्म आणि चक्र हीं चिन्हं दिसलीं कीं तीच माझी मूर्ति असं तूं समज."

स्वच्छ अन् सुसंगत असें स्वप्न. राजा खडबडून उठला. त्याला नीलमाधवाचें दर्शन झालें होतें. त्याचे मेघगंभीर शब्द त्याच्या कानांत अजून घुमत होते. त्याच्या अहंकाराला मात्रेचा वळसा मिळाला होता. मंदिर बांधणें तेवढें आपल्या हातीं; पण त्यांत देवाची वस्ती होणें हें सर्वस्वीं देवाच्या इच्छेवर. देव माझ्या मंदिरांत यायला हवा असेल तर त्याची आज्ञा शिरीं धरली पाहिजे, असें त्यानें मनाशीं ठरविलें.


दुसऱ्याच दिवसापासून तो अश्वमेधाच्या उद्योगाला लागला. किती तरी वर्षें लागलीं; पण एकेक करून त्यानें शंभर अश्वमेध पार घातले. तो आतां देवाच्या आगमनासाठीं उतावीळ होता. एवढें सर्वांगसुंदर मंदिर; पण तें अजून देवाविना रितें आहे, शून्य आहे, ही गोष्ट त्याच्या मनाला लागून राहिली होती.

एखादा चंदनी ओंडका कुठें तरी किनाऱ्याला लागला आहे का, निदान लाटांवर तरंगतांना तरी दिसतो का, तें पहाण्यासाठीं त्यानें आपले शेंकडों दूत समुद्रकिनाऱ्यावर पेरून ठेवले. कांहीं दिवसांनंतर एका दूतानें येऊन वार्ता सांगितली.

"महाराज, दक्षिणेला असलेल्या शबरद्वीपांतून एक भला मोठा चंदनाचा ओंडका वाहत वाहत किनाऱ्याला लागला आहे. त्याच्यावर चक्र आणि पद्म अशीं चिन्हें उमटलेलीं दिसतात."

राजा एकदम उद्गारला. "अरे, तोच! स्वप्नांत सांगितल्याप्रमाणें देव आपल्या घरीं आला. पालखी सजवून बाहेर काढा.

तिच्यावर चवऱ्या, अबदागिरें धरा. चौघडे सनया सुरू होऊं देत. नगरजनांना मिरवणुकींत येण्याचा हुकूम सोडा. कमानी उभारा. तोरणं लावा. राजरस्ता शृंगारा. आपल्याला देव राजधानींत आणायचा आहे."



ओंडक्याची मिरवणूक

राजानें सगळ्या सरंजामानिशीं वाजवीत, नाचवीत तो ओंडका मंदिराच्या प्राकारांत आणून ठेवला. त्याची पूजा अन् आरती केली. मग नगरांतील नामांकित कारागीर पाचारले. 'तुमचं कसब पणाला लावून या ओंडक्याची एक सर्वांगीं नेटकी अन् रेखीव अशी विष्णुमूर्ति बनवा' असा त्यांना हुकूम दिला.

कारागीर सरसावले. शुभ मुहूर्त पाहून कामाला लागले. नमस्कार करून त्यांनीं तो ओंडका पुढें घेतला. पण काय आश्चर्य सांगावें! एकाचीहि रंधा, पटाशी त्याच्यावर चालेना. हत्याराची धार मोडायची; पण ओंडक्याची नखाएवढीसुद्धा कळपी निघायची

नाहीं. कारागिरांनीं हात टेकले. राजाला तसें कळवलें. राजा पुन्हां चिंतेंत पडला. एकेक संकट अचानक पुढें उभें रहातें, त्या अर्थीं माझ्या हातून ही देवप्रतिष्ठा होणार का नाहीं, अशा विकल्पानें त्याला ग्रासलें.

राजा अशा प्रकारें जडमूढ अवस्थेंत बसलेला पाहून इतके दिवस ज्याच्याकडे कोणाचेंहि लक्ष गेलें नाहीं असा एक म्हातारा कारागीर पुढें आला. त्यानें राजाला हात जोडून म्हटलें.

" महाराज, माझं नांव अनंत. मी एक मूर्तिकार आहें. वृद्ध-पणामुळें अलीकडे माझा हात कांपतो. दृष्टीहि जरा अधू झाली आहे. पण आपले सगळे कारागीर हातपाय गाळून बसल्यामुळें मला पुढें येणं भाग झालं आहे. आपण परवानगी द्याल तर एका अटीवर मी एकवीस दिवसांत या ओंडक्यांतून विष्णुमूर्ति आकाराला आणीन. "

" कोणती अट सांग. " राजानें उत्कंठित होऊन म्हटलें.

" आपण मला देवळाच्या गाभाऱ्यांत एकटा ठेवून देवळाचे दरवाजे बंद करायला हवेत. एकवीस दिवसपर्यंत कोणींहि दरवाजा उघडतां कामा नये अन् मला पहातां कामा नये. महाराज, हा नियम आपणालासुद्धा लागू आहे. "

इंद्रद्युम्न राजानें ती अट तात्काळ मान्य केली. मग तो ओंडका गाभाऱ्यांत नेऊन ठेवला. पाठोपाठ म्हातारा अनंत देवळांत शिरला. राजानें देवळाचीं द्वारें बंद करायला लावलीं, बाहेर पहारा ठेवला आणि पुढें काय घडतें तें पहाण्यासाठीं तो डोळ्यांत तेल घालून राहिला.

मंदिरांत स्वतःला कोंडून घेतल्यानंतर म्हातारा अनंत तो ओंडका:पुढें घेऊन बसला. सजीव अनंत आणि निर्जीव ओंडका



अनंत सुतार आाणि ओंडका

या दोघांची गांठ पडली. अनंताचा रंधा त्यानें आपल्यावर चालवून घेतला असेल का ? इतर कारागिरांनीं त्याच्यापुढें हात टेंकले, तीच पाळी अनंतावरहि येणार नाहीं ना ? अनंत तरी असा विक्षिप्त कसा ? त्यानें स्वतःला कोंडून कां घेतलें ? लोकांच्या डोळ्यांदेखत त्यानें मूर्ति कां घडवली नाहीं ? यांत कांहीं ढोंग धत्तुरा तर नसेल ? ठकबाजी तर नसेल........?

राज्यांतलि सर्व लोकांच्या मनांत असे नाना प्रकारचे विकल्प येऊं लागले. खुद्द राणीलाच संशयानें अधिक पछाडलें. आठ दिवस जेमतेम गेल्यावर ती एके दिवशीं राजाला म्हणाली.

“ काय हा तुमचा देवभोळेपणा ? त्या म्हाताऱ्या कारागिरानें तुम्हांला पुरतं बनवलं. अहो नगरांतल्या नामांकित मूर्तिकारांना जें साधलं नाहीं तिथें हा अधु डोळ्यांचा म्हातारा काय करणार कपाळ ? तुम्ही एकदा देवळाचं दार उघडून पहा. मला असं वाटतं कीं, तो म्हातारा महाठक आहे. देवळाच्या नक्षींत जडवलेलीं सोन्यामोत्यांचीं फुलं तो सावकाशपणें काढून घेईल आणि एका रात्रीं पसार होईल. ”

पण राजाला राणीचें हें बोलणें पटलें नाहीं आणि रुचलेंहि नाहीं. त्यानें ती गोष्ट या कानानें ऐकली ; त्या कानानें सोडून दिली. काय असेल तें असो, राजाचा त्या म्हाताऱ्यावर विश्वास होता. त्याच्या ठिकाणीं त्याला कांहीं तरी दैवी अंश प्रतीत झाला होता.

अशा स्थितींत दुसराहि आठवडा लोटला. नगरांत निरनिराळे लोकप्रवाद सुरू झाले. दासी-बटकींच्या मार्फत ते राणीच्याहि कानां-पर्यंत पोहोंचूं लागले. राणी घायकुतीस आली. तिला वाटलें कीं, ज्या अर्थीं सगळें जग बोलतें, त्या अर्थीं यांत नक्कीच कांहीं तरी काळेंबेरें आहे. ती पुन्हां येऊन राजाच्या कानाला लागली. अगदीं खनपटीसच बसली. राजाचेंहि मन जरा कमकुवत झालें. तोहि राज्यां-तल्या अनेक वार्ता आणि वदंता ऐकत होता. अखेर त्यानें देवळांत प्रवेश करायचें ठरवलें. राणीला बरोबर घेऊन तो निघाला. किंचित् कांपणाऱ्या हातानें त्यानें मंदिराचें महाद्वार उघडलें. दोघें आंत शिरलीं. सभामंडपांतल्या भिंतीवरची आणि कमानीवरची नक्षी पाहूं लागलीं. सगळें देऊळ सौम्य अशा प्रकाशानें शोभत होतें. तीं

सोन्यामोत्यांचीं फुलें जागच्या जागीं ठाकठीक होतीं. कारागिरानें त्यांतलें एकहि फूल चोरलें नव्हतें.

राजा एकेका पावलानें पुढें गेला आणि त्यानें गाभाऱ्याचेंहि दार लोटलें. दोघांचीहि दृष्टि आंत वळली. पण आंतल्या प्रकाशांत त्यांना काय दिसलें ?

हातपाय नसलेला जगन्नाथाचा मुखवटा. त्यावरचे वटारलेले डोळे. जणुं तो महाक्रोधानें राजाकडे पहातो आहे. त्याच्या एका बाजूला बलराम आहे. आणि दुसऱ्या बाजूला त्याची बहीण सुभद्रा आहे. त्यांचेहि फक्त तोंडावळेच. तींहि हातपाय नसलेलीं नुसतीं लुंडेंच. या तीन विरूप आणि व्यंग अशा मूर्ति हारीनें उभ्या आणि म्हातारा अनंत मात्र एकाएकीं अदृश्य !

राजा प्रथम हतबुद्ध झाला. मग घाबरला. त्याचे हातपाय लटपटूं लागले. जगन्नाथाच्या डोळ्यांवर खिळलेली दृष्टि त्याला बाजूला काढतां येईना. त्याला वाटलें कीं, समोरचा तो देव स्वतःच्या उग्र दाहक नेत्रांनीं आपल्याला भाजून काढतो आहे. राजाची अवस्था मोठी कठीण झाली.

पण तो राजा सात्त्विक होता. त्याच्या अंतरांत देवाविषयीं प्रेम नांदत होतें. त्याच्यासाठींच तर त्यानें शंभर अश्वमेध केले होते. आणि त्या श्रद्धेला भाळूनच देव त्याच्या राज्यांत आला होता. पण अरेरे ! त्या देवांची दशा किती विचित्र होती ! राजाच्या नेत्रां-तून झरझर अश्रुधारा वाहूं लागल्या. भावाचा पाहुणा जगन्नाथ !

त्याला ते अश्रू पहावले नाहींत. त्या मूर्तीच्या मुखांतून एकाएकीं दयापूर्ण असे शब्द उमटले.

"हे राजा, प्रथम अहंकार धरलास म्हणून माझी इंद्रनीळ मण्याची मूर्ति तुला लाभली नाहीं. आतां राणीच्या शंकेखोरपणाला बळी पडलास म्हणून मी या अशा अपूर्ण, अर्धवट अवस्थेंत तुझ्यापुढें उभा आहें. तो कारागीर आतां परत भेटणं नाहीं. यापुढें मला हातपाय लाभायचे नाहींत. या क्षणीं मी ज्या अवस्थेंत आहें त्याच अवस्थेंत मला आतां कायमचं रहावं लागेल. तूं आतां याच स्वरूपांत माझी प्रतिष्ठा कर. अशाहि स्थितींत मी तुझ्या भक्तिभावाला समाधान देईन."

# तीर्थराज प्रयाग

प्रयाग हें उत्तर प्रदेशांतलें एक मोठें नगर आहे. काशी, प्रयाग आणि गया या त्रिस्थळी यात्रेंतलें हें एक क्षेत्र. इथें गंगा आणि यमुना या दोन पवित्र नद्यांचा संगम झालेला आहे. तिसरी सरस्वती गुप्त रूपानें या संगमांत मिसळली आहे असें मानतात. त्यामुळें या संगमाला त्रिवेणी संगम असें नांव पडलें आहे. प्राचीन काळीं या प्रदेशाचें नांव वारणावत असें होतें. प्रजापतीनें इथे यज्ञ केला म्हणून याला प्रयाग असें नांव पडलें.



प्रयागमधील धर्मराजाची मूर्ति

या क्षेत्राशीं भरद्वाज ऋषीचा संबंध आहे. गंगा–यमुनांच्या संगमावर आजहि त्याचा आश्रम दिसतो. भगवान् श्रीरामप्रभु वनवासांत दक्षिणेला जात असतां या भरद्वाजाच्या आश्रमांत आला होता आणि त्या मुनीनें त्याचा उत्तम सत्कार केला होता.

संगमावर स्नान, श्राद्ध, किल्ल्यांतल्या अक्षयवटाचें आणि भरद्वाजाचें दर्शन आणि सुवासिनी स्त्रियांचें वेणीदान हे या क्षेत्रांतले महत्त्वाचे

तीर्थविधि. पं. नेहरूंचें आनंदभुवन नांवाचें निवासस्थान याच ठिकाणीं आहे. तेंहि लोक दर्शनीय मानतात. प्रतिवर्षी माघ मासांत माघमेळा, दर सहा वर्षांनीं अर्धकुंभ, आणि बारा वर्षांनीं पूर्णकुंभ असे मेळे प्रयाग येथे भरतात. पूर्णकुंभाचा मेळा सर्वांत मोठा आणि महत्त्वाचा.

समुद्रमंथनांतून निघालेल्या अमृतकुंभासाठीं देव-दैत्यांचें हमरी-तुमरीचें युद्ध झालें. त्यांत तो अमृतकुंभ देवांच्या हातून ज्या ज्या ठिकाणीं खालीं पडला, तें तें ठिकाण पुढें यात्रेचें क्षेत्र बनलें. अशीं स्थानें चार आहेत. हरिद्वार, प्रयाग, उज्जैन आणि नाशिक. या चारांत प्रयाग क्षेत्राला असामान्य महत्त्व प्राप्त झालें तें आद्य शंकराचार्यांच्या योजनेमुळें. प्रयाग क्षेत्राला एवढें मोठेपण त्यांनीं कां आणि कसें मिळवून दिलें, त्याची कथा पुढें दिली आहे.

* * *

पंचपंच उषःकाल होता. कौशांबी नगरी अजून पूर्ण जागी झाली नव्हती. पाखरांची किलबिलहि नुकतीच कुठें सुरू झाली होती. आकाशांतल्या मोठ्या तारका अजून आपलें तेज राखून होत्या. वातावरण शांत असूनहि उत्साहजनक होतें. क्षणाक्षणाला अंधार उजळत होता आणि पायांखालचा रस्ता अधिकाधिक स्पष्ट होत होता.

अशा या ब्राह्ममुहूर्तीं अग्नीसारखा तेजःपुंज आणि दिग्गजपंडित कुमारिलभट्ट काखेंत गवाळें आणि हातांत कमंडलु घेऊन गंगास्नानाला चालला होता. गंगामाईचें पात्र समोर दिसत होतें आणि त्यावर वाफेची शुभ्र अन् मऊ मऊ दुलई पसरली होती. हातापायांना कांकडवणारी थंडी पडली होती खरी; पण त्या आचारनिष्ठ ब्राह्मणाला केव्हा एकदा गंगेंत बुडी मारीन असें झालें

होतें. तो पावलापावलानें गंगाकिनारा जवळ करीत होता. चालत चालत तो नगराच्या सीमेपर्यंत आला आणि त्याचे पाय एकदम थबकले. कोण्या तरी स्त्रीचा करुणध्वनि त्याच्या कानांवर पडत होता.

'किं करोमि क्व गच्छामि को वेदानुद्धरिष्यति'

'मी काय करूं? कुठें जाऊं? वेदांचा उद्धार कोण करील? कोण त्यांचा त्राता?' अशा अर्थाचा तो विलाप होता. कुमारिलभट्टानें मार्गेपुढें पाहिलें. आजूबाजूलाहि दृष्टि टाकली. पण शब्द ऐकूं येतो आणि, व्यक्ति मात्र दिसत नाहीं. त्याला अचंबा वाटला. पण ते शब्दच इतके दीन-करुण होते कीं, त्यांनीं कुमारिलभट्टाच्या काळजांतच घर केलें. तो विचार करूं लागला.

'कोण बरें ही? वेदांची एवढी पोटतिडिक कोणाला? बौद्ध धर्मीयांनीं ग्रासलेल्या, घेरलेल्या या नगरींत, या गंगा नदीच्या पुण्य तीरावर कोणत्या माउलीचा हा दबता विलाप? ही कोणी सामान्य किंवा लौकिक स्त्री नव्हे. ही साक्षात् वैदिक संस्कृति आपल्या सुपुत्रांना हाकारून बाहते आहे.'



श्रुतिमातेचा विलाप

पुन्हा तोच आवाज. पुन्हा तीच करुणा. कुमारिलभट्ट कळवळला. ज्या वैदिक संस्कृतीचा पान्हा पिऊन तो वाढला होता, विद्वान् झाला

होता, त्या आईची ती हाक होती. ती ऐकून मूकस्तंभ कसें रहायचें ? उत्तर न देतां पुढें कसें जायचें ? एवढा विचार करी-पर्यंतसुद्धा त्याला धीर निघाला नाहीं. ज्या बाजूनें ती हाक आली त्या दिशेकडे तोंड करून त्यानें खणखणीत शब्दांत म्हटलें.

" आई, मी करीन. वेदांचा उद्धार मी करीन. तुझं दुःख फेडीन! कार्य तरी साधीन ; नाहीं तर देह तरी त्यागीन!"

वैदिक धर्माची परिस्थिति खरोखरच तशी होती. हर्षाच्या कारकीर्दीत थोडीशी दबलेली बौद्ध धर्माची लाट सातव्या शतकांत तितक्याच जोरानें पुन्हा उसळली होती. बौद्ध धर्मीय राजांच्या तीक्ष्ण खड्गानें वैदिक धर्माचीं पाळेंमुळें तोडायला प्रारंभ केला होता. रोजच्या रोज हजारों स्त्री-पुरुष बौद्धांच्या पंथांत आणि संघांत सक्तीनें खेंचले जात होते. भगवान् बुद्धाच्या करुणामय आणि अहिंसक धर्माचें केवळ विडंबन चालू झालें होतें. महायान, हीनयान इत्यादि बौद्ध पंथांमध्यें वज्रयान पंथ फोंफावला होता. त्या पंथाचे महंत ' खा, प्या, मजा करा ' हाच मंत्र आपल्या अनु-यायांना उपदेशीत होते. वैदिकांचे यज्ञयाग तर संपले होतेच ; पण साधेसुधे नीतिधर्महि शिल्लक राहिले नव्हते. जिकडे तिकडे विहार, भिक्षु, भिक्षुणी, अनाचार आणि भ्रष्टाकार!

' मी काय करूं! कुठें जाऊं ? वेदांचा उद्धार कोण करील ?' हा विलाप वैदिक संस्कृतीनें मांडला होता तो या परिस्थितींत. कुमारिलभट्टानें त्या विलापाला प्रतिसाद दिली आणि त्याच दिवशीं त्यानें त्या कार्यासाठीं कंबर बांधली. तो एकच ध्यास त्यानें घेतला. तेंच आपलें जीवितकार्य ठरवलें.

कुमारिलभट्टाला ' भट्टपाद ' असें गौरवानें म्हणत. तो मीमांसाशास्त्रांत गाढा पंडित होता. इतरहि अनेक शास्त्रांचें त्यानें आलोडन केलें होतें. त्याचें अध्ययन सदाचारानें तेजस्वी झालें होतें. पण बौद्ध आचार्यांशीं सामना द्यायचा तर तेवढ्यानें भागण्यासारखें नव्हतें. बौद्धांचें आणि जैनांचें मत काय आहे त्याचा पूर्ण अभ्यास केल्यावांचून, त्यांतल्या खांचाखोंचा आत्मसात् केल्यावांचून त्यांच्याशीं वादाला उभें राहणें अशक्य होतें.

म्हणून त्यानें एका जैनधर्मी आचार्याकडे जाऊन आणि त्याचें शिष्यत्व पत्करून थोड्याच काळांत तीं दोन्ही मतें अभ्यासिलीं. अशा प्रकारें आपलें अध्ययन सर्वांगीण करून घेऊन तो बौद्धांशीं द्वंद्व खेळायला पुढें आला. अनेक महान् महान् आचार्य त्यानें वादांत पराभूत केले. निरनिराळ्या राजांच्या दरबारांत जाऊन तिथल्या पंडितसभा जिंकल्या. ' मी हरलों तर बौद्ध होईन; तुम्ही हरलांत तर वैदिक धर्माचा स्वीकार करायला हवा ' या अटीवरच तो वादाला प्रवृत्त होई.

सुधन्वा राजाच्या दरबारांत त्यानें याच प्रकारें वैदिक धर्माचें श्रेष्ठत्व सिद्ध केलें आणि राजाला म्हटलें. ' आतां तूं या दरबारी पंडितांच्यासह आणि सगळ्या प्रजेसह पुनश्च वैदिक धर्म स्वीकार. ' राजाला भट्टपादाचा शास्त्रार्थ पटला होता. पण तरीहि त्याचें मन डळमळत होतें. तो म्हणाला.

" भट्टपाद! धर्माचा निर्णय केवळ वादावर किंवा तर्कावर अवलंबून ठरवणं बरं नव्हे. त्यासाठीं कांहीं तरी दैवी साक्षात्कार अवश्य आहे. वैदिक धर्म श्रेष्ठ असेल तर तुम्ही या समोरच्या डोंगरा-

वरून खालीं उडी मारा. तसं करून जर जिवंत राहिलांत तर मी खात्रीनें वेदमार्गाला अनुसरेन."

भट्टपादानें वेळ लावला नाहीं. धर्मासाठीं कसलेंहि दिव्य करायला तो तयार होता. त्यानें आपले प्राण जणुं हृदयांतून काढून मुठींतच घेतले होते. तो पर्वतशिखरावर चढला आणि 'जर वेद प्रमाण असतील तर मी जगेन.' असे शब्द उच्चारून त्यानें खालीं उडी घातली.

आणि तो जगला. एक डोळा जायबंदी होण्यापलीकडे त्याला कसलीहि दुखापत झाली नाहीं. सुधन्वा राजाला तें परम अद्भुत वाटलें. त्यानें तर वैदिक धर्म अंगीकारलाच; शिवाय सगळ्या दरबारी पंडितांना आणि प्रजेलाहि तसें करायला लावलें.

अशा अनेक सभा त्यानें जिंकल्या. अनेकांना पुनश्च वैदिक धर्मांत आणलें. पण हें करणें म्हणजे बिळें बुजवण्यासारखा प्रकार होता. आकाशच फाटलें होतें, तिथें अशीं ठिगळें लावून कितीसें भागणार ! बौद्ध पंडित आणि आचार्य त्याच्यापुढें हरलों म्हणत, वैदिक धर्म स्वीकारल्याचें नाटक करीत अन् त्याची पाठ वळली कीं पुन्हा 'बुद्धं शरणं गच्छामि!'

एवढ्यांत माघ महिना आला. माघांतल्या संक्रांतीला प्रयाग येथें मोठा मेळा भरणार होता. तिथें बौद्धांची धर्मपरिषद भरणार होती. बुद्धधर्माचे महाविद्वान् असे शेंकडों आचार्य आणि समरधुरंधर पंडित अष्ट दिशांतून तिथें जमणार होते. धर्मविचार होणार होता. फड रंगणार होता. विद्वज्जन आपापल्या विद्यागुणांनीं चमकणार होते. प्रचाराच्या योजना आंखल्या जाणार होत्या.

भट्टपादानें तिथें जायचें ठरवलें. हें धर्ममहामंडळ जर वादांत जिंकलें तर भरतखंड जिंकल्याचें श्रेय मिळेल आणि आपला उद्देश चांगल्या प्रकारें सफळ होईल असें त्याला वाटलें. तो योग्य वेळीं तिथें पोंचला. परिषदेच्या मंडपांत जाऊन त्यानें आचार्यांना आणि पंडितांना वादाचें आव्हान दिलें. त्यांनीं तें स्वीकारलें. ठरलेल्या वेळीं वादाला प्रारंभ झाला. बौद्ध आचार्य आपल्याच दंभांत होते. ते मनांत म्हणत होते कीं, या वैदिक ब्रह्मबंधूचा काय पाड लागणार आमच्यापुढें !

पण भट्टपाद आपला सिद्धान्त घट्ट पकडून प्रतिस्पर्ध्यांचें युक्तिसिद्ध खंडन करूं लागला. एखाद्या प्रवाशानें हातांतल्या तीक्ष्ण शस्त्रानें झाडांच्या फांद्या आणि वेलींचीं जाळीं कचाकच तोडीत रानांतून आपला मार्ग काढावा, तसे बौद्ध पंडितांचे अनेक पूर्वपक्ष तोडीत, मोडीत तो आपला सिद्धान्त प्रतिपादूं लागला. त्याची विद्वता विजेसारखी तळपूं लागली. त्याचा युक्तिवाद भाल्याच्या टोंकासारखा बौद्धांच्या हृदयांत घुसूं लागला. ते क्षणाक्षणाला निरुत्तर होऊं लागले. तो वाद बौद्धांच्या अंगाशीं येणार, त्यांच्याच परिषदेंत त्यांचाच पराभव होणार, अशीं स्पष्ट चिन्हें दिसूं लागलीं.

अर्थात् हें त्यांना सहन होणेंच शक्य नव्हतें. त्यामुळें जिथें पंडित गप्प बसले तिथें पंडितंमन्य गुंड पुढें आले. त्यांनीं चहूं बाजूंनीं हुल्लड उठवली. शेंकडों तोंडें एकाच वेळीं गिल्ला करूं लागलीं. भट्टपाद गोंधळला. चक्रव्यूहांत सांपडल्यासारखी त्याची अवस्था झाली. त्या परिषदेनें त्याची सर्व बाजूंनीं हुर्यो उडवली आणि अखेर त्याला मंडपांतून हाकलून दिलें. बिचारा जिवानिशीं सुटला हें भाग्य !

पण ही गोष्ट भट्टपादाच्या जिव्हारीं लागली. त्याचे मनोरथ ढासळले. महत्त्वाकांक्षा कोलमडून पडल्या. वादांत जय झाला असला तरी बहुसंख्येच्या अभिनिवेशापुढें तो हतप्रभ झाला होता. शिवीगाळ आणि अभद्र भाषण यांच्यापुढें त्याची विद्वत्ता कुचकामी ठरली होती. त्यानें मनांत ठरवलें, ' वैदिक धर्माला पुनश्च उजळा देण्याचें हें प्रचंड कार्य आपल्या आवांक्याबाहेरचें आहे. तें केवळ विद्वत्तेनें होणार नाहीं. केवळ सभा जिंकण्यानें साधणार नाहीं. त्यासाठीं दैवी तेजच हवें. अवतारी सामर्थ्यच हवें. लोकांना दिपवील, मोहील, शरण आणील असें कांहीं तरी दिव्य भव्यच हवें. '

ही जाणीव होतांच त्याला आपलें जीवन भारभूत वाटूं लागलें. त्यानें देहत्याग करण्याचें ठरवलें. पण पर्वतावरून उडी घेऊन किंवा गंगेंत बुडी देऊन एका क्षणांत तो आपलें आयुष्य संपवणार नव्हता. त्यासाठीं तो एक महाभयंकर मार्ग अनुसरणार होता. आपला मृत्युसुद्धा सार्थकीं लागावा, तो पाहून लोकांच्या हृदयाला चरका बसावा, जनतेचे डोळे खाडकन् उघडावे, म्हणून त्यानें आत्म-त्यागाची एक अद्‌भुत तऱ्हा शोधून काढली. त्यानें बराच मोठा धान्याच्या कोंड्याचा ढीग जमवला, त्यांत स्वतःला गळ्यापर्यंत पुरून घेतलें आणि त्या राशीवर जळता निखारा ठेवला. कोंडा जळूं लागला, धग आंत आंत शिरूं लागली आणि भट्टपाद त्यामधें पिचूं लागला.

गंगेच्या तीरावर, त्रिवेणी संगमाशेजारीं एक विद्वान् कर्मठ ब्राह्मण आपल्याला अशा भयंकर रीतीनें जाळून घेत आहे, ही वार्ता

त्या क्षेत्रांत आगीसारखी पसरली. लोक तें बलिदान पाहण्यासाठीं तिकडे लोटूं लागले. त्यांतच एक संन्यासी होता. संन्यासी म्हणजे वृद्ध



भट्टपाद तुषाग्नींत जळत आहे

नव्हे; तर नुकतीच मिसरुड फुटूं लागलेला तरुण. त्याच्या मुखावर तेज होतें. वाणींत ओज होतें. डोळ्यांत धार होती. चालण्यांत दम होता. आकाशांतला बालसूर्यच खालीं उतरला आहे कीं काय असेंच कोणालाहि त्याच्याकडे पाहून वाटे.

त्याचें नांव शंकर असें होतें. बालपणींच सर्व शास्त्रांत पारंगत होऊन त्यानें आचार्य ही पदवी मिळवली होती. त्याची बुद्धि म्हणजे नुसती तलवारीची धार होती. मनुष्यरूपानें तो दैवी अंशच कोणत्या तरी महान् कार्यासाठीं पृथ्वीवर अवतरला होता. आतां

तो लगबगीनें गंगातीरीं जात होता तो कुमारिलभट्टाच्या दर्शनासाठीं आणि शक्य तर त्याचें आत्मबलिदान थांबवण्यासाठीं. एवढा मोठा सत्त्वधीर वेदवेत्ता पुरुष अशा प्रकारें जगांतून नष्ट व्हावा ही दुर्घटना त्याला सहन होत नव्हती.

जाणते लोक त्याच्याकडे पाहून म्हणत. 'ते पहा शंकराचार्य चालले आहेत.' मग तेहि त्यांच्यामागून जाऊं लागले. आचार्य थोड्याच वेळांत त्या ठिकाणीं पोंचले. भट्टपाद जिवंतपणीं चितेंत जळत आहेत, हें त्यांनीं पाहिलें. चहूं बाजूंनीं आग जळत होती; पण तिच्यापेक्षांहि भट्टपादाच्या हृदयांतली आग अधिक प्रखर होती. तिचेच चटके त्यांना अधिक बसत होते. तो निर्धाराचा महामेरु डोळ्यांत एकहि अश्रु न आणतां आणि कपाळावर त्रासिकपणाची एकहि रेषा न दाखवतां तें अग्निदिव्य करीत होता. आचार्य हात जोडून आणि डोळ्यांत पाणी आणून त्याला म्हणाले.

"भट्टपाद, बाहेर या. नाहक आत्मघात करूं नका. तुमच्यासारख्यांचं जीवन असं वृथा जळण्यासाठीं नाहीं. भारत राष्ट्राला तुमची, तुमच्या विद्येची, तुमच्या आचरणाची, तुमच्या महनीय अधिकाराची, सगळ्या सगळ्याची गरज आहे."

तें ऐकून भट्टपाद बाहेर आला का? नाहीं. त्याचा निश्चय अभंग होता. तो तिथूनच म्हणाला.

"*तरुण यतिवर्या! माझं जीवितकार्य संपलं. मी सर्वस्वीं अपेशी ठरलों आणि आयुष्याला विटलों. तूं माझी करुणा करूं नकोस. माझ्यासाठीं डोळे ओले करूं नकोस. करुणा करायची तर वैदिक संस्कृतीची कर. ती आज अनाथ झाली आहे. तुडवली गेली आहे.*

तिनं विलाप मांडला आहे. 'मी काय करूं? कुठें जाऊं? वेदांचा उद्धार कोण करील?........' ही आर्त हाक तुझ्या कानीं पडूं दे. तूं तिचा उद्धार कर."

"वस्तुतः देशोदेशींच्या राजांनीं हें काम करायचं; पण त्यांच्या तलवारी आजमितीस बोथट झाल्या आहेत. ते स्वतःच निर्वीर्य झाले आहेत. भारतांत सगळीकडे फूट पडली आहे. एक राजा दुसऱ्या राजाला पाण्यांत पाहतो, अशी स्थिति झाली आहे. त्यांतच बौद्ध मठपतींची बळजोरी. त्यामुळें जनता भयग्रस्त झाली आहे. सारीं वैदिक कर्मं लुप्त झालीं आहेत. मीं त्यांचा पुनरुद्धार करण्याचा प्रयत्न केला, त्यासाठीं हालताप भोगले ; पण शेवटीं अयशस्वी ठरलों. आतां माझा भरंवसा तुझ्यावर. माझ्या हृदयांतली आग तुझ्या हृदयांत घालून मी जात आहें. माझ्या अंतकालीं तुझी भेट झाली हा योगायोगच म्हणायचा. तूं वेदांचा उद्धारकर्ता हो. जगांत अतुलनीय यश मिळव. मीं जातों....मी जातों...."


आणि त्या चितेनें एकाएकीं भट्टपादाला ग्रासून घेतलें. शंकराचार्य भावविवश झाले. वेदांसाठीं बलिदान! संस्कृतीसाठीं बलिदान! केवढें असामान्य धैर्य होतें तें! कुमारिलभट्टाच्या जळत्या आत्म्याला स्मरून शंकराचार्यांनीं त्याच क्षणीं प्रतिज्ञा केली!

"भट्टपाद! तुमचं अपुरं कार्य मी पुरं करीन!"

दुसऱ्याच क्षणापासून आचार्यांच्या कामाला सुरवात झाली. त्यांनीं प्रकांड वैदिक पंडितांच्या गांठीभेटी घेतल्या. तरुण शास्त्री-पंडित एकत्र केले. त्यांची मोठी संघटना उभारली. तिच्या मार्फत

प्रयाग येथेंच एक धर्मपरिषद बोलावली. वैदिक पंडितांप्रमाणेंच बौद्धांचे आचार्य आणि मठपति यांनाहि निमंत्रणें धाडलीं. अवघ्या कांहीं महिन्यांत भारताच्या कोनाकोपऱ्यांतले धर्माचार्य तिथें जमा झाले. ज्यानें भट्टपादाला पर्वतावरून उडी घ्यायला सांगितलें होतें तो माहिष्मतीचा राजा सुधन्वा त्या परिषदेचा अध्यक्ष झाला.

उभयपक्ष समोरांसमोर बसले. शंकराचार्यांनीं परिषदेचा उद्देश



शंकराचार्य व बौद्ध यांचा वाद

आपल्या धीरगंभीर वाणीनें कथन केला. ही परिषद निर्णायक व्हावी, असा आपला हेतु सांगितला. सर्वांनीं त्याला मान तुकवली. जो पक्ष हरेल त्यानें दुसऱ्या पक्षाचें मत स्वीकारायचें अशी अट ठरली. सुधन्वा राजानें सर्वांना तसें बजावून त्यांच्याकडून स्पष्ट कबुली घेतली. बौद्धांना अहंकार होता कीं, आपलाच जय होणार ! वैदिकांना वाटत होतें कीं, ज्या अर्थीं शंकराचार्यांसारखा दैवी

शक्तीचा पुरुष आपल्या पक्षाला आहे, त्या अर्थी आपला जय ठेवलेलाच. त्यामुळें दोघांनींहि ती अट खुषीनें स्वीकारली.

लगेच वादाला प्रारंभ झाला. खंडनमंडनें चालू झालीं. दोन्ही पक्ष तुल्यबल ; त्यामुळें वादाला अद्भुत रंग चढला. किती तरी दिवस तो वाद चालला. दोन्ही पक्ष एकमेकांवर मात करूं लागले. खरें कोणाचें, खोटें कोणाचें याविषयीं श्रोते जम संशयांत पडले. पण अखेर वैदिकांचें पारडें जड होऊं लागलें. त्यांचे सिद्धान्त प्रस्थापित होऊं लागले. प्रतिपक्षी डळमळले. आचार्यांच्या अमोघ कोटिक्रमापुढें बौद्धांना हार खावी लागली.

वादांत पराजय झाला कीं हुल्लड उठवायची हें बौद्धांचें तंत्र ठरलेलें होतें. याहि प्रसंगीं ते तसेच मुद्यावरून गुद्दयावर आले. चहूं बाजूंनीं शंकराचार्यांवर शिव्याशाप आणि असभ्य शब्द यांचा वर्षाव करूं लागले. आचार्यांना हुसकून लावण्याची त्यांची इच्छा होती. पण आचार्य मेरु पर्वतासारखे अचल राहिले. सुधन्वा राजाहि खंबीर होता. त्यानें आपल्या सैनिकांकरवीं या वज्रयान पंथाच्या गुंडांचा ताबडतोब बंदोबस्त केला. परिषदेंतल्या बौद्ध पंडितांना त्यानें स्पष्ट शब्दांत सांगितलें कीं, ‘ तुमचा पराजय झाला आहे. तुम्हांला आतां सनातन धर्माचा स्वीकार करणें भाग आहे. ’ कांहीं खुषीनें आणि कांहीं नाइलाज म्हणून पुनश्च मूळ धर्मांत आले. आचार्यांची विजयपताका फडकली. त्या दिवसापासून भारतांतल्या बौद्ध धर्माला ओहोटी लागली. शंकराचार्यांनीं आसेतुहिमाचल संचार करून दिग्विजय केले. सर्व भारताला पुनश्च त्याच्या मूळ संस्कृतीच्या ओटींत घातलें. वैदिक धर्माची पुनर्रचना केली.

बौद्धांच्या संस्कृतींतला उपयुक्त भाग सनातन धर्मांत समाविष्ट करून घेतला. नाना प्रकारचीं द्वैतें आणि वादंगें मोडून अद्वैताची प्रस्थापना केली. कांहीं नवे नियम, नवे आचार निर्माण केले. सनातन धर्मांत नवी स्फूर्ति, नवें चैतन्य आणलें. वैदिक संस्कृति विलाप करीत होती, तिचें दुःख दूर केलें. कुमारिलभट्टाच्या हुतात्म्याला समाधान दिलें

ज्या दिवशीं प्रयागच्या धर्मपरिषदेंत त्यांचा पहिला आणि घवघवीत विजय झाला, त्याच दिवशीं त्यानें सुधन्वा राजाच्या अनुमतीनें घोषित केलें. "भारतांतल्या प्रत्येक व्यक्तीनें चारी धामांच्या यात्रा कराव्या. त्या निमित्तानें भारताचें विशाल आणि समग्र दर्शन करावें. ज्याला शक्यता नसेल त्यानें तशी आकांक्षा तरी धरावी. जगायचें तें भारतभूमीसाठीं, मरायचें तेंहि तिच्याचसाठीं."

"प्रति बारा वर्षांनीं मकर राशीला गुरु आला असतां प्रयागच्या त्रिवेणी संगमावर वैदिक धर्माचें महासंमेलन भरवावें आणि त्यांत धर्माची, आचारविचारांची चर्चा व्हावी. जें मलिन झालें असेल तें शुद्ध करावें. जें समाजाच्या प्रगतीला आवश्यक असेल तें त्यांत समाविष्ट करावें. धर्म आणि संस्कृति यांच्या अनुरोधानें समग्र भारतीय जीवनाचाच विचार व्हावा. या यात्रेला कुंभपर्व असें नांव द्यावें. ही यात्रा महान् पुण्यकारक समजावी. या यात्रेंत धर्माचें चिंतन, त्रिवेणीसंगमांत स्नान आणि साधुसंतांचा, विद्वज्जनांचा समागम, असें त्रिविध फळ प्राप्त होईल."

शंकराचार्यांचा हा आदेश भारतीय जनतेनें आनंदानें मान्य केला. आणि त्या दिवसापासून प्रयागाचें आणि कुंभमेळ्याचें माहात्म्य वाढलें तें अद्यापि भारतीय जनांच्या अंतःकरणांत कायम आहे.

---

# गया गदाधर

गया हें त्रिस्थळी यात्रेंतलें शेवटचें स्थळ. हें बिहार राज्यांतलें एका जिल्ह्याचें मुख्य ठिकाण आहे. फल्गु नदीच्या तीरावर याची वसति आहे. विष्णुपद हें मुख्य तीर्थ ज्या भागांत आहे त्याला जुनी गया म्हणतात. फल्गूच्या दुसऱ्या तीरावरची गया साहेबगंज या नांवानें ओळखली जाते. सरकारी इमारती आणि नवी वस्ती साहेबगंजांतच आहे. यात्रेकरू या ठिकाणीं येतात ते विष्णुपदावर पिंड देऊन पितरांचा उद्धार करण्यासाठीं. विष्णुपदाचें मंदिर बरेंच मोठें आहे. पण त्याची रचना कलात्मक नाहीं. मंदिराच्या मध्यभागीं एक अष्टपैलू कुंड आहे. त्याची कड चांदीच्या पत्र्यानें मढविलेली आहे. या कुंडांतल्या शिळेवर सोळा अंगुळें लांब श्रीविष्णूचें पदचिन्ह उमटलें आहे. गयेंत श्राद्ध करून याच विष्णुपदावर पितरांना पिंडदान करायचें असतें. विष्णुपदाशिवाय गयेंत आणखी पंचेचाळीस तीर्थें आहेत. प्रेतशिला, रामतीर्थ, धर्मारण्य, अक्षयवट, गदालोल, इत्यादि त्यांचीं नांवें आहेत. अक्षयवटावर गयार्जन होतें. तें झाल्यावर मनाजोगती दक्षिणा घेऊन गयावळ ब्राह्मण, यात्रेकरूला यात्रेचें सुफल देतो. यात्रे-



विष्णुपद मंदिर

नी... ३

करून आपल्या आवडीचें एखादें फळ सोडायचें असतें तें याच ठिकाणीं. फल्गु नदी म्हणजे एक मोठें वाळवंटच आहे. मधूनच लहानसा प्रवाह झुळझुळ वाहातो. आपण पालथे पडलों तरीसुद्धा डोक्यावरून पाणी जाणें कठीण. पण वाळवंटांत खड्डा खणला म्हणजे तिथें मात्र पाणी लागतें. म्हणजे या नदीचा प्रवाह वाळवंटाच्या खालून आहे. पूर्वी ही दुधाची नदी होती; पण रामचंद्राच्या शापामुळें ती पालथी झाली अशी आख्यायिका सांगतात. भारतीय संस्कृतींत गयेला एवढें महत्त्व कोणत्या घटनेमुळें आलें ती कथा पुढें दिली आहे.

*  *  *

आज कैलासशिखरावर शंकराला कसली तरी त्वरा झाली होती. भस्मचर्चन आणि प्रातःसंध्या कशीबशी आटोपून त्यानें जटाजूट बांधला होता. गळ्याभोंवतीं नागवेष्टन गुंडाळून त्रिशूळ अन् डमरू उचलले होते. नंदी त्याला पाठीवर घेण्यासाठीं पुढें आला तर त्यानें त्यालाहि 'तूं नको' म्हणून दूर केलें होतें. गजानन आणि षडानन यांच्या प्रश्नांनाहि समाधानकारक उत्तर न देतां तो मार्गस्थ झाला होता.

पण एवढ्यांत पार्वती पुढें आली अन् तिनें शंकराची वाट अडवली. ती म्हणाली.

"हें काय? कुठें जाणार तें सांगून नाहीं का जायचं?"

"छे: छे:! सांगायला वेळ नाहीं. मला घाई करून शक्य तितक्या लवकर गेलं पाहिजे."

"अहो, पण कुठें?"

"खालीं, पृथ्वीतलावर!"

"कोण असा तुमच्यासाठीं तहानला आहे तिथें?"

" माझा एक जाज्वल्य भक्त. गयासुर ! "

" ठीक, तुम्हांला भक्त भेटायचे ते सगळे असुरच. मागें तो लंकेचा रावण भेटला होता. नंतर तो भस्मासुर...."

" देवि, सगळ्या असुरांना एका मापानं मोजूं नको. हा गयासुर त्यांतला नाहीं. तो तामस स्वभावाचा नाहीं. यानें आपल्या भक्तीनें अन् आचरणानें देवांना उणं केलं आहे. पहा एकदा; ज्ञानदृष्टीनें खालीं पृथ्वीतलावर पहा. तो बघ त्या नदीतीरावरचा आश्रम. तिथल्या एका वृक्षाखालीं बसून गयासुर तप करतो आहे. पक्षी त्याच्या अंगाखांद्यावर खेळताहेत. साप त्याच्या मांडीवर लोळताहेत. सगळे वनचर हिंस्र पशू वैरभाव विसरून त्याच्या-भोंवतीं जमत आहेत. त्याच्या मुखांतून एकच ध्वनि उमटतो आहे—' ॐ नमः शिवाय ! ' त्याच्या त्या मंत्राचा सभोंवतींच्या वातावरणावर इतका परिणाम झाला आहे कीं, वृक्ष-पाषाणांच्या अंगांतूनहि तोच एक नाद घुमूं लागला आहे. आज त्याच्या तपाची परिसीमा झाली. आज त्यानें माझं आसन हालवलं. आतां मला गेलंच पाहिजे. देवि, मला आतां लगबग झाली आहे. चाललों मी. पार्वती, मला अडवूं नको."

आणि दुसऱ्याच क्षणीं शिव मनोवेगानें पृथ्वीतलावर उतरून गयासुरापुढें उभा राहिला. देव आल्याची साक्ष त्याला आधीं अंतरांत पटली अन् डोळे उघडल्यावर साक्षात् दर्शन झालें. गयासुर खडबडून उठला आणि शिवाच्या चरणीं लागला. ज्याच्या दर्शनाची आस धरून आज कित्येक वर्षं देहाचें काष्ठ केलें, तो शिवपरमेश्वर एकदाचा भेटला म्हणून त्याच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू

खळाळूं लागले. केवढा उंच अन् धिप्पाड होता तो! त्याच्या रूपानें जणूं एखादा डोंगरच पाझरतो आहे असें वाटावें. शिवानें त्याच्या मस्तकावर हात ठेवला, त्याचे अष्ट सात्त्विक भाव जागृत केले आणि त्याला म्हटलें.

"गयासुरा! इच्छा असेल तें मागून घे!"

शिवाला वाटलें होतें कीं, तो समुद्रवलयांकित पृथ्वीचें साम्राज्य मागेल. कदाचित् सप्तस्वर्गांची सत्ता मागेल. कदाचित् पंचमहाभूतांवर अधिकार मागेल. कदाचित् कोण्याहि बळिवंताशीं युद्धप्रसंग आला तरी आपला पराभव होऊं नये असें मागेल. पण हें सगळें सोडून गयासुरानें मागितलें तें अगदींच वेगळें. शंकराच्याहि कल्पनेपलीकडचें.

"देवाधिदेव! मला स्वतःसाठीं कांहींहि नको आहे. मला चिंता वाटते ती या प्राकृत जनांची. त्यांच्या उद्धाराचा मार्ग खुंटल्यासारखा झाला आहे. त्यांना यज्ञयाग करण्याचं सामर्थ्य नाहीं. तप करण्याची शक्ति नाहीं. उपासतापास करण्याइतका दम नाहीं. मोक्षाची आकांक्षा आहे; पण साधनेचं बळ नाहीं. कसा या जनतेचा उद्धार व्हायचा! कोण त्यांना जन्म-मरणांच्या यातनांतून सोडवील? त्यासाठीं माझा जीव तुटतो आहे. म्हणून देवा, मला अशी शक्ति दे, कीं जो कोणी मोक्षाच्या इच्छेनें मजकडे येईल तो केवळ माझ्या दृष्टीनें उद्धरून जावा!"

शंकर मनांत म्हणाला—'धन्य गयासुर! लोकांच्या उद्धारासाठीं तळमळणारा पुण्यपावन आत्मा!' शिवाला त्याचें कौतुक

वाटलें आणि क्षणाचाहि विलंब न करतां त्यानें गयासुराला ‘ तथास्तु ’ म्हटलें.

मग गयासुर तिथून उठला आणि कीकट देशांत फल्गु नदीच्या तीरीं आश्रम करून राहिला. त्याला शंकराकडून मोक्षदानाचा वर मिळाल्याची वार्ता लवकरच सगळीकडे पसरली. त्रिविध तापानें पोळणारीं माणसें गयासुराकडे येऊं लागलीं. त्याच्या केवळ दृष्टीनेंच त्यांचीं संचित पापें जळूं लागलीं. त्यांचा आत्मा प्रसन्न होऊं लागला. मृत्यु झाल्यावर ते लोक सरळ वैकुंठाच्या मार्गानें धावूं लागले.

जो जो माणूस गयासुराच्या दृष्टीस पडला त्याच्याकडे वांकडी नजर करायला यमदूतांची छाती होईना. यमदूत सकाळीं उठून पृथ्वीवर येत अन् संध्याकाळीं हात हालवीत परत जात. यमलोक ओस झाला. कुंभीपाक, रौरव इत्यादि यातनेचे नरक उताणे पडले. चित्रगुप्ताच्या वहीखात्यावर नवी नोंद होईनाशी झाली. यमाला कामच उरलें नाहीं.

यम अस्वस्थ झाला, चिंतेंत पडला. काय करावें तें सुचेना म्हणून त्यानें सत्यलोकाचा मार्ग धरला. ब्रह्मदेवापुढें जाऊन आपलें गाऱ्हाणें मांडलें. ब्रह्मदेवहि त्याच विवंचनेंत होता. त्याच्याहि सृष्टि-कार्यांत विघ्न आलें होतें. प्राणिमात्र जर मुक्तच होऊं लागले तर पुनर्जन्म घ्यायचा कोणाला ? ब्रह्मदेव म्हणाला, ‘ गयासुरावर माझाहि उपाय चालण्यासारखा नाहीं. आपण दोघे श्रीविष्णूकडे जाऊं. ’

मग ते दोघे मिळून वैकुंठीं गेले. श्रीहरीचें दर्शन झाल्यावर ब्रह्मदेव दीनवाणीनें त्याला सांगूं लागला.

" वैकुंठपते, पृथ्वीवर महान् अनर्थ माजला आहे. गयासुर मोक्षदानाचें सदावर्त उघडून बसला आहे. ज्याला मुक्ति हवी असेल त्यानें त्याजकडे जावं, त्याचा एक कटाक्ष मिळवावा आणि खुशाल मोक्षपद गांठावं. मोक्ष इतका सुलभ झाल्यामुळें लोकांनीं तीर्थयात्रा सोडल्या. वेदाध्ययन बंद केलं. यज्ञयाग झुगारून दिले. व्रतं, दानं, उद्यापनं टाकून दिलीं. लोकांचा कर्मकांडावरचा विश्वास उडाला. त्यामुळें देवांना हविर्भाग मिळेनासा झाला. स्वर्गांत देवांची उपासमार होऊं लागली. एकूण सगळीच घडी विस्कटली. आणि हें सगळं त्या गयासुराचं कर्म.... "

त्यावर श्रीविष्णु म्हणाला.

" गयासुराला महादेवाचा वर आहे. त्यामुळें त्याच्यावर उघड हल्ला करतां येणार नाहीं. त्याला युक्ति–प्रयुक्तीनेंच जिंकलें पाहिजे. विधात्या, चल आपण पृथ्वीतलावर जाऊन त्याची गांठ घेऊं. "

विष्णु आणि ब्रह्मदेव ब्राह्मणांचीं रूपें घेऊन पृथ्वीवर उतरले. मार्गानें जात असतां अनेक लोक त्यांना भेटले. जो भेटेल तो गयासुराची प्रशंसा करीत होता.

" असुर जातींत जन्म घेऊनहि त्यानें ख्याति केली. केवळ लोकांच्या उद्धारासाठीं झटणारा असा दयाळू महात्मा चालू युगांत झाला नाहीं. देवांच्या मनांतहि द्वेष, असूया, स्वार्थ, लोभ हे विकार आढळतात. पण हा महाभाग या सर्व दोषांपासून अलिप्त आहे. त्याचं हृदय म्हणजे विश्वकरुणेचा सागर.... "

जिथें जावें तिथें सर्वांच्या तोंडचीं हीं स्तुतिस्तोत्रें ऐकत असतां श्रीविष्णूला वाटलें कीं, गयासुर हें प्रकरण आपल्याला बरेंच जड

जाणार आहे. त्याचा पराभव झाला तर तो त्याच्या सौजन्यानेंच व्हायचा.

अखेर ब्राह्मणवेषधारी ब्रह्मा–विष्णु गयासुरापाशीं जाऊन पोंचले. गयासुरानें त्यांना सादर नमस्कार केला. दोघांनीं त्याला आशीर्वाद दिले अन् ते एकाएकीं अदृश्य झाले. तें पाहून गयासुर म्हणाला.

" विप्रहो! आपण माझ्या घरीं येऊन असा लपंडाव कां बरं खेळतां? आपली काय इच्छा आहे तें मला स्पष्टपणें समजलं नाहीं, तर मी आपलं प्रिय कशा रीतीनें करूं?"

ब्रह्मा–विष्णु पुन्हा प्रगट झाले. विष्णु त्याला म्हणाला.

" मी वैकुंठपति विष्णु. हा सत्यलोकाचा अधिपति ब्रह्मा. आम्हांला या ठिकाणीं एक मोठा यज्ञ करायचा आहे. यज्ञसंस्था लुप्त होत चालली आहे तिचा पुनरुद्धार करायचा आहे. पृथ्वीवरच्या मानवांना यज्ञाचं महत्त्व काय तें प्रत्यक्ष प्रयोगानें दाखवून द्यायचं आहे. तेव्हां तुझ्याकडे मागणी अशी कीं, तुझ्या या विशाल क्षेत्रांतली एखादी शुद्ध भूमि तूं यज्ञासाठीं आम्हांला दे."

गयासुर त्या गोष्टीला आनंदानें सिद्ध झाला. तो त्यांना समागमें घेऊन निघाला. त्यानें एका तलावाकाठची जमीन दाखवली. पण विष्णूनें तिच्यांत दोष काढला. एका वडाखालची भूमि दाखवली. देवांना तिथेंहि दोष दिसला. जी जी भूमि दाखवावी, तिथें तिथें देवांनीं दोष सांगावा असा प्रकार घडला. शेवटीं गयासुरानें हात टेकले. तो म्हणाला, 'आतां माझ्याकडे याहून शुद्ध भूमि नाहीं. माझा निरुपाय आहे.'

त्यावर विष्णु म्हणाला.

" गयासुरा, असं कां बोलतोस? तुझं पुण्यपावन शरीर हीच सर्वांत शुद्ध भूमि आहे. तुझ्या पाठीवर आम्हांला यज्ञ करण्याची अनुमति दे."



गयासुराच्या पाठीवर यज्ञ

गयासुर म्हणाला. " फार छानं! हें मला सुचलं नाहीं. तुम्हीं सुचवलंत म्हणून ठीक. नाहीं तर माझं सत्त्व गेलं असतं. मी पालथा निजतों. तुम्ही माझ्या पाठीवर स्थंडिल घाला आणि तुमचा यज्ञ सिद्धीला न्या."

देवांना आनंद झाला. त्यांनीं यज्ञाची सिद्धता सुरू केली. वरून देव आले. आजूबाजूनें श्रौतपंडित ब्राह्मण आले. तो सोहळा पहायला माणसांचा मेळावा जमला. गयासुराच्या पाठीवर अग्निस्थापना झाली. कुंडांतून ज्वाळा निघूं लागल्या. ब्राह्मण हवन करूं लागले; तसा अग्नि खूपच प्रज्वलित झाला. गयासुराच्या पाठीचा

दाह होऊं लागला. त्याच्या त्या प्रचंड शरीरभर आगजाळ भिनली. अंगांतून घामाचे लोट वाहूं लागले. पण त्या महाभागाची सहनशक्ति त्याहून मोठी. त्यानें पाठ तर हालवली नाहींच; पण जरासुद्धा चुळबुळ केली नाहीं.

देवांना अचंबा वाटला. पहाणारा जनसमुदाय स्तंभित झाला. ज्याच्या त्याच्या तोंडून शब्द निघूं लागले. 'असा सत्त्वधीर पाहिला नाहीं. असं आत्मबळ ऐकलं नाहीं. धन्य गयासुर! धन्य महात्मा! एकवार नव्हे; त्रिवार, शतवार धन्य!'

एक-दोन दिवस नव्हे; तर सहा महिने तो यज्ञ अखंड चालला. सहा महिन्यांनंतर एक दिवस गयासुरानें ब्रह्मदेवाला विचारलें. 'अजून हें सत्र किती दिवस चालायचं आहे?' ब्रह्मदेव उत्तरला. 'अजून तीन महिने.' गयासुर बोलला, 'ठीक आहे, चालूं द्या. यज्ञासाठीं या माझ्या जड शरीराचा उपयोग होत आहे, यापरतं त्याचं सार्थक कोणतं!' नऊ महिने पुरे झाले आणि पूर्णाहुतीची वेळ आली तेव्हां गयासुरानें सांगितलें.

"देव हो! माझ्या पंचप्राणांची पूर्णाहुति अग्नीला समर्पण करा. आतां कसलेहि मायापाश उरले नाहींत. जगण्याचीहि आसक्ति नाहीं. कल्याणाचीसुद्धा वासना उरली नाहीं. आता सगळं ब्रह्मार्पण!...."

त्यासरशीं यम पुढें झाला आणि त्यानें एक भलीमोठी शिळा उचलून गयासुराच्या मस्तकावर ठेवली. लागलीच श्रीविष्णु त्या शिळेवर एक पाय देऊन उभा राहिला. गयासुर त्या शिळेखालीं शांत होण्याच्यापूर्वी श्रीविष्णूनें त्याला वरदान उच्चारलें.

"आजपासून हें क्षेत्र 'गयाक्षेत्र' या नांवानें प्रसिद्ध होईल. गया गदाधर या स्वरूपांत मी या क्षेत्रीं कायमचा वास करीन.




श्रीविष्णु शिळेवर पाय देत आहे

गयासुराच्या शिरावर ठेवलेल्या या शिळेवर जिथें माझें पाऊल उमटलें आहे, तिथें जे पिंडदान करतील त्यांचे पितर उद्धरून वैकुंठाला जातील !"

# बोधिवृक्ष

ज्या बोधिवृक्षाखालीं बसून अडीच हजार वर्षांपूर्वी गौतम बुद्धानें मानवजातीच्या दुःखावर उपाय शोधून काढला तें बुद्धगयेचें स्थान गयेपासून सात मैलांच्या अंतरावर आहे. हिंदूंची जशी काशी, तसेंच



बुद्धगयेचें मंदिर

जगांतल्या सर्व बौद्धधर्मीयांचें तें महान् क्षेत्र आहे. गयेला आतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झालें आहे, तें याच कारणामुळें. अनेक बौद्धधर्मीय साधक

निरनिराळया देशांतून या ठिकाणीं येतात आणि बुद्धाच्या चरणस्पर्शानें पावन झालेल्या या भूमीवर धर्मसाधना करतात.

सर्वांत प्रथम सम्राट् अशोकानें इथें बोधिवृक्षाजवळ एक स्तूप उभारला. आजचें बुद्धमंदिर याच स्तूपाच्या स्थानावर उभारलेलें आहे. हें मंदिर वीस फूट उंचीच्या चौथऱ्यावर उभारलेलें आहे. चबुतऱ्याच्या प्रत्येक कोनावर मुख्य मंदिराच्या आकृतीप्रमाणेंच लहान लहान चार मंदिरें आहेत.

या मंदिराचा जीर्णोद्धार ब्रह्मदेशांतल्या बौद्धांनीं चौदाव्या शतकाच्या सुमारास केला. आजची भगवान् बुद्धाची मूर्ति त्यांनींच बसविलेली आहे. तिचा चेहरामोहरा ब्रह्मी वळणाचाच दिसतो.

तो पवित्र बोधिवृक्ष आजहि तिथें आहे ; पण बुद्धकालीन मात्र नव्हे. असे अनेक वृक्ष त्या ठिकाणीं लावले गेले आणि ते अनेकवार परचक्रांच्या हल्ल्यांत मोडून तोडून फेकलेहि गेले. मात्र आजहि त्या ठिकाणीं जो पिंपळ आहे, तो मूळच्या स्थानावरच आहे एवढी गोष्ट खरी. सुमारें बारा–तेराशें वर्षांपूर्वी ह्युएनत्संग नांवाचा चिनी भिक्षु हिंदुस्थानात या बुद्धभूमींत आला होता. त्यानें या बोधिवृक्षाचें तत्कालीन वर्णन लिहून ठेवलें आहे. तो म्हणतो.

" या वृक्षाचीं पानें उन्हाळयांत अथवा हिंवाळयांतहि झडत नाहींत. फक्त जेव्हां निर्वाणप्राप्तीचा तो वर्षदिवस येतो तेव्हां तीं झडतात. पण पुन्हां दुसऱ्याच दिवशीं पूर्वीप्रमाणेंच ताजीं व सुंदर पानें त्याला फुटतात. प्रत्येक वर्षदिनाच्या मंगल प्रसंगीं राजे व सरदार लोक या वृक्षाच्या छायेखालीं जमतात, त्यावर दुधाचा अभिषेक करतात, त्याच्यापुढें दिवेवाती पाजळतात, त्याला फुलें वहातात आणि त्याचीं कांहीं पानें प्रसाद म्हणून बरोबर घेऊन आपापल्या स्थानाला जातात. "

अशा या क्षेत्राची मूळ कथा पुढें दिलेली आहे.

* * *

सनपूर्व ५६३ वर्षांचा काळ. त्या वेळीं नेपाळच्या सीमेवर कपिलवस्तु नांवाचें नगर होतें. शुद्धोदन नांवाचा राजा त्यावर

राज्य करीत होता. त्याच्या थोरल्या राणीचें नांव मायावती. ती गर्भवती होती आणि नवमास भरलेल्या अवस्थेंत ईशान्येच्या उपनगरांतल्या 'लुंबिनीचें वन' या उपवनांत आली होती. तिथें एका अशोकाच्या झाडाची फांदी धरून उभी असतां तिला प्रसूतिवेदना सुरू झाल्या. थोड्याच वेळांत वैशाख वद्य अष्टमी आणि पुष्य नक्षत्र या दिनशुद्धीवर तिनें एका दिव्य बालकाला जन्म दिला.

त्याच क्षणीं ब्रह्मा आणि इंद्र या देवांनीं खालीं उतरून त्या बालकाला आपल्या हातावर झेललें. नागराजांनीं त्याच्या पहिल्या स्नानासाठीं शीत आणि उष्ण अशा पाण्याचे दोन झरे निर्माण केले. स्वर्गांत मनोहर संगीत सुरू झालें. पृथ्वीवर सुगंधी वारे वाहूं लागले. शुद्धोदन राजा आनंदसागरांत डुंबूं लागला. सगळ्या राज्यांत उल्हास बहरला.

राजधानींत पुत्रजन्माचा सुखसोहळा चालू असतां असित नांवाचा एक तपोधन मुनि तिथें आला. मायावतीच्या मांडीवर पहुडलेल्या त्या बालकाला उद्देशून त्यानें सद्गदित कंठानें म्हटलें. 'हे बालका, तूं साक्षात् भगवान् अवतार धरून पृथ्वीवर आला आहेस. तूं जगांत सत्यधर्माचा प्रसार करशील. पण तुझा हा दिग्विजय पहायला मी मात्र जिवंत असणार नाहीं, याची हळहळ वाटते.' लगेच तो मुनि शुद्धोदनाकडे वळून म्हणाला. 'राजा, हा पुत्र म्हणजे मानवतेच्या वृक्षाला आलेलें सुंदर पुष्प आहे. थोड्याच काळांत याच्या ज्ञानसुगंधानें दशदिशा भरून जातील!'

शुद्धोदन राजानें 'सिद्धार्थ' असें त्याचें नांव ठेवलें. सिद्धार्थ ज्या दिवशीं जन्मला त्याच दिवशीं आणखी तीन व्यक्ती जन्माला

आल्या. आनंद नांवाचा त्याचा शिष्य, कंथक नांवाचा त्याचा घोडा आणि पुढें ज्याला बोधिवृक्ष असें नांव मिळालें तो पिंपळ. सिद्धार्थ आठ वर्षांचा होतांच शुद्धोदन राजानें त्याला विद्या शिकवण्यासाठीं अनेक नामांकित गुरूंची योजना केली. गुरुजी पाठ देऊं लागले, शिष्य ते घेऊं लागला. थोड्याच काळांत तो सकलशास्त्रांत पारंगत झाला. गुरुजनांनीं त्याच्या बुद्धीपुढें आणि धारणेपुढें हात टेकले. त्यांना वाटलें कीं, हा गुरूंचाहि गुरु आहे.

सिद्धार्थाचें कुलनाम गौतम असें होतें. प्रजाजन त्याच नांवानें त्याला संबोधीत. गौतम सोळा वर्षांचा होतांच शुद्धोदन राजानें त्याच्यासाठीं नवा राजवाडा बांधला. गौतमाला सर्व ऋतूंतलीं सुखें आणि स्वर्गीय राजविलास एकाच ठिकाणीं मनसोक्त भोगायला मिळावेत, अशी व्यवस्था त्या राजवाड्यांत केलेली होती. त्याच्या सातव्या मजल्यावर जो मंडप उभारला होता, त्याचें नांव ' चंद्रलोक ' असें होतें.

या नव्या राजमहालांत गौतमाची प्रतिष्ठा करण्यापूर्वीं शुद्धोदनानें त्याला यौवराज्याचा अभिषेक करायचें ठरवलें. त्याच वेळीं त्याच्या लग्नाचाहि बेत आंखला. चहूं दिशांना तशी द्वाही फिरवली. ज्यांच्या घरीं मुली होत्या, असे अनेक राजे कपिलवस्तूंत येऊन शुद्धोदनाला म्हणाले.

" तुमचें कुलशील चांगलें आहे. राजपुत्राहि सुंदर अन् तरुण आहे. त्याचें वयहि बेताचेंच आहे. पण त्याच्या विद्येची परीक्षा घेतल्यावांचून आम्हीं त्याला मुलगी कशी द्यावी ? "

शुद्धोदनानें हा प्रतिवाद गौतमाला कळवला. गौतमानें सांगितलें कीं ' दरबार भरवून माझी परीक्षा घ्या. सर्वांच्या आशंका फिटूं देत.' शुद्धोदनानें त्याप्रमाणें दरबार भरवला. शास्त्री, कलावंत, शस्त्रपंडित असे नामांकित परीक्षक बोलावले. गौतमानें त्यांच्या-समोर सर्व विद्या आणि कला यांची परीक्षा दिली. तो कुठेंहि चुकला नाहीं कीं अडखळला नाहीं. भरल्या दरबारानें ' वाहवा ' म्हटलें. मग राजे म्हणूं लागले कीं ' माझी मुलगी करा, माझी मुलगी करा.'

मग शुद्धोदनानें रूपागुणांची पारख करून, मुद्रेवरचे शांत-सौम्य भाव पाहून, महानामा राजाची कन्या यशोधरा गौतमासाठीं नेमस्त केली. त्या दोघांचा विवाह थाटामाटानें पार पडला. यशोधरेनें आपले जीवप्राण गौतमाच्या चरणीं वाहिले. शुद्धोदनानें गौतमाला यौवराज्याचा अभिषेक केला; पण राज्यसूत्रें मात्र त्याच्या हातीं दिलीं नाहींत. ' हा मुलगा वीतराग होऊन घरादाराचा अन् राज्यवैभवाचा त्याग करील' असें भविष्य गौतमाच्या जन्माच्या वेळींच ज्योतिष्यांनीं वर्तविलें होतें. शुद्धोदन त्यामुळें धास्तावला होता आणि गौतमाला शक्य तितका विलासांत बुडवून ठेवूं पहात होता.

वयाच्या एकोणतीस वर्षांपर्यंत गौतम तसा राहिला. तेवढ्या अवधींत चैन आणि आराम यांशिवाय त्यानें दुसरें कांहींच केलें नाहीं. तेवढ्यांत यशोधरेला एक बाळ झालें. राहुल असें त्याचें नांव ठेवण्यांत आलें. रूपस, गोंडस मुलगा. गौतमाला तो एकदम प्रिय झाला. इतके दिवस त्याला यशोधरा हा एकच रेशमी पाश होता. आतां त्याहून चिवट असा दुसरा पाश बसला. गौतम विलासी

सुखमय संसारांत पुरता गुरफटला. शुद्धोदन राजाची धास्ती हळू-हळू कमी होऊं लागली. गौतम राजवाड्याच्या सोनेरी पिंजऱ्यांतून कधींहि बाहेर पडूं नये, त्याच्या मनांत संसाराबद्दल, जीवनाबद्दल घृणा निर्माण होईल असें कोणतेंहि अभद्र, ओंगळ दृश्य त्याला दिसूं नये, असा कडेकोट बंदोबस्त त्यानें केला होता. त्याच्या-भोंवतीं सदैव वसंत बहरलेला असावा, सुवासिक फुलें हसतांना डोलतांना दिसावीं, वायुलहरी खेळत रहाव्या, पाखरें किलबिलत असावीं, मंजुळ स्वर कानीं पडत रहावे, अशीच व्यवस्था शुद्धोदन राजानें करून ठेवली होती. गौतम जणूं भूमीवरच्या स्वर्गांत विहरत होता.

पण यानंतर थोड्याच दिवसांत गौतमाच्या आयुष्यांत क्रांति करणारा एक दिवस उगवला. कां कोण जाणे, तो एकदम अस्वस्थ झाला. त्याला गुदमरल्यासारखें वाटूं लागलें. इथून बाहेर पडावें, दूर कुठें तरी भटकावें, लांबचीं क्षितिजें पहावीं, मैदानांतला वारा प्यावा, अशी त्याला अनावर इच्छा झाली. त्यानें आपला रथ सिद्ध करायची आज्ञा दिली. सुंदर पोषाख करून तो रथांतल्या व्याघ्र-चर्माच्या आसनावर बसला. सारथ्यानें रथ हाकारला आणि दूर-वरच्या एका सुंदर उद्यानाकडे चालवला. मोकळी हवा मिळतांच गौतमाचें शरीर अन् मन टवटवीत झालें. डोळे जणूं आजूबाजूचा नटलेला निसर्ग पिऊं लागले. तो मनांत म्हणाला, 'किती सुंदर अन् सुखमय हें जग........!'

पण थोड्याच वेळांत त्याचें हृदय दचकलें. तो म्हणाला, 'अरे, हें काय!' रस्त्याच्या कडेनें एक माणूस चालला होता. जख्ख

म्हातारा. तोंडाचें बोळकें. डोळे गारगोटीसारखे. कातडीला सुरकुत्या. कमरेला पोंक. तोंड जमिनीला लागलेलें. झोकांडी जाऊं नये म्हणून हातांतली काठी टेकीत टेकीत तो चालला होता. कुठें जात होता देव जाणे! गौतमानें सारथ्याला विचारलें, 'हें असं कां?' सारथी म्हणाला, 'हें असंच व्हायचं महाराज. प्रत्येक माणूस शेवटीं या स्थितीला यायचा.' गौतमाच्या तोंडून उद्गार निघाले, 'अरेरे!' त्याला वाटलें कीं, आपल्याहि घाटदार तेजस्वी शरीराला शेवटीं अशीच अवकळा येणार तर—

पण एवढ्यानेंच काय झालें होतें? पुढें तसेंच आणखी एक दृश्य. एक माणूस रस्त्याच्या कडेला धुळींत पडला होता आणि शरीराच्या व्याधींनीं तळमळत होता. गौतमानें विचारलें, 'हा काय प्रकार?' सारथी म्हणाला, 'व्याधी आणि वेदना हे तर शरीराचे भोगच आहेत. राव असो, रंक असो; ते कोणालाच चुकले नाहींत.' गौतमाला वाटलें कीं, आपल्या देहांतून तशाच कांहीं कळा अन् वेदना उमटत आहेत. आणखी थोडें पुढें गेल्यावर त्याला दिसलें एक प्रेत. गौतमानें त्या क्षणीं गपकन् डोळे मिटले. तो सारथ्याला म्हणाला, 'काय रे हें!' सारथी म्हणाला, 'हें होय! ही मनुष्यप्राण्याची अखेरची अवस्था!'

या एकापुढें एक पाहिलेल्या तीन अभद्र दृश्यांनीं गौतम पुरता विरजला. सारथ्याला तें समजलें. त्यानें त्याला उपवनांत नेलें. एका लताकुंजांत बसवलें. सुगंधी फुलांचे गेंदेबाज हार आणून त्याच्या गळ्यांत घातले. ताजीं मधुर फळें खायला आणून दिलीं.

पण छेः ! गौतमाचें मनःस्वास्थ्य बिघडलें तें बिघडलेंच. त्याचा सुंदर मुखडा इतका मलूल पडला कीं त्याचें तेज जणूं कोणीं काढूनच नेलें होतें.

गौतमानें पाहिलें कीं, जरा, व्याधि आणि मृत्यु या त्रिविध दुःखानें जग ग्रासलें आहे. जगाला या दुःखांतून मुक्त करणारें एखादें अमृतरसायन नसेलच का? अवश्य असेल. मग तें आपण शोधून काढलें पाहिजे. पण तें भोगविलासांत गुरफटून राहिल्यानें कसें मिळेल? त्यासाठीं गृहत्याग करून, निर्जन वनांत राहून प्रखर साधना करावी लागेल.



पत्नी-पुत्राचा त्याग

त्याच रात्रीं गौतमानें गृहत्याग करायचें ठरविलें. सर्वांची निजानीज झाल्यावर तो पलंगावरून उठला. त्यानें छंदक नांवाच्या

आपल्या सारथ्याला उठवलें आणि आपला कंथक नांवाचा घोडा तयार करून राजद्वारांत उभा करायला सांगितलें. जातांना एकदा आपल्या प्रिय पुत्राचें मुख पहावें म्हणून तो यशोधरेच्या शयन-मंदिराकडे वळला. दार उघडतांच आंतल्या सुगंधी तेलानें जळणाऱ्या दिव्यांचा घमघमाट बाहेर आला. यशोधरा जाईजुईच्या पुष्पशेजेवर गाढ झोंपली होती आणि राहुलहि तिच्या कुशींत मुठी मिटून झोपीं गेला होता. पुढें जावें अन् चटकन् आपल्या वंशाच्या दिव्याला उचलून घ्यावें असें क्षणभरच त्याच्या मनांत आलें. पण तो थबकला. तसें करीत असतांना यशोधरा जागी होण्याचा संभव होता. तसें झालें असतें म्हणजे तिनें त्याच्या निर्धारांत मोठेंच विघ्न आणलें असतें.

आणि गौतम तसाच माघारीं फिरला. महाद्वारांत येऊन तो आपल्या लाडक्या कंथकावर स्वार झाला. घोड्याला टाच देण्या-पूर्वी त्यानें एकवार त्या राजवाड्याकडे पाहिलें. त्याला विलासी राजमहाल स्मशानासारखा वाटला. तो प्राकाराच्या द्वारांतून राज-मार्गावर आला. गौतम गृहत्याग करून निघाला तो मुहूर्त मंगल-कारक ठरला. गौतमाच्या मागाहून त्याचा सारथी छंदकहि होता. रात्रभर त्यांचा प्रवास चालला होता. पहांटेच्या सुमारास ते राज्याची सीमा ओलांडून आनोमा नदीच्या तीरीं आले.

तिथें गौतम घोड्यावरून खालीं उतरला. जवळून एक शेतकरी जात होता. त्याला त्यानें जवळ बोलावलें. आपलीं राजवस्त्रें त्याला दिलीं आणि त्याचे फाटके तुटके कपडे आपण घातले. जवळच्या

खड्गानें त्यानें आपले लांबसडक केसहि कापून टाकले. कंथक घोड्याला छंदकाच्या स्वाधीन करून त्याला परत जायला सांगितलें. आपल्या धन्याचें हें विपरीत वागणें पाहून छंदकाला परम दुःख झालें. डोळ्यांत पाणी आणून तो म्हणाला.

"महाराज, असं वैराग्य घेऊन तुम्ही निघून गेलांत तर तुमच्या घरच्या मंडळीला किती दुःख होईल!"

त्यावर गौतमानें किंचित् हसून म्हटलें.

"अरे, मी सगळ्या जगाचंच दुःख दूर करायला निघालों आहें. जगाबरोबर घरच्या माणसांचंहि दुःख दूर होईलच."

छंदक कंथकाला घेऊन मोठ्या कष्टानें परत फिरला. पण त्या मुक्या प्राण्याला धन्याचा वियोग सहन झाला नाहीं. त्याच्या शरीराला एकाएकीं कंप सुटला. तो धाडकन् जमिनीवर पडला. कांहीं क्षण गडबडा लोळून त्या उमद्या वारूनें आपले प्राण सोडले. छंदकाला एकट्यानेंच राज्यांत जावें लागलें.

गौतम तिथून पुढें निघाला तो सरळ वैशालींत आला. त्याला आतां योगसाधन करायचें होतें आणि त्यासाठीं जाणत्या गुरूची अपेक्षा होती. कोणीं तरी त्याला सांगितलें कीं, या नगरांत आलार कालम नांवाचा कोणी एक ब्राह्मण सिद्ध योगी आहे आणि तो लोकांना विषयनिवृत्ति आणि सर्वसंगपरित्याग हीं तत्त्वें उपदेशीत आहे.

गौतमानें तिथें जाऊन त्याचें शिष्यत्व पतकरलें. पण बरेच दिवस तिथें राहूनहि त्याला समाधान वाटेना. मग त्यानें गुरुगृह सोडून पांडव पर्वत गांठला. राजगृह नांवाची बिंबिसार राजाची राजधानी तिथून जवळच होती. गौतम त्या राजधानींत भिक्षा

मागे आणि पर्वतावर आणून ती खाई. कोणी एक राजबिंडा तरुण रोज नगरांत भिक्षा मागतो हें कळतांच बिंबिसार राजाला जिज्ञासा उत्पन्न झाली. त्यानें गौतमाची गांठ घेऊन त्याला 'कोण, कुठले' म्हणून प्रश्न केले. गौतमानें आपलें कुळगोत्र सांगितलें. तें ऐकून बिंबिसाराला आश्चर्य वाटलें. तो म्हणाला.

"गौतम, राजपुत्राला ही भिक्षांदेहि शोभत नाहीं. सत्ता आणि वैभव या वस्तूंची उपेक्षा करणं योग्य नव्हे. तुझ्यासारख्या उदार बुद्धीच्या राजाला मी माझं सगळं राज्य अर्पायला तयार आहें."

गौतम तें ऐकून गंभीर झाला. त्यानें बिंबिसार राजाला नम्रपणें म्हटलें.

"राजेश्वरा, मीं तुझं राज्य घेऊन काय करूं! मला जर राज्यच हवं असतं तर माझ्या हक्काचं होतं तें मीं कां सोडलं असतं ? राज्य काय, वैभव काय, सत्ता काय, हें सगळं दुःखमय आहे. जग तृष्णेच्या आहारीं जाऊन दुःख भोगीत आहे. त्याला दुःखमुक्त करणारा मार्ग शोधायला मी निघालों आहें."

बिंबिसार राजाला त्यावर काहीं बोलतां आलें नाहीं. तो गौतमाला प्रणाम करून परत फिरला. गौतमानें मग तेंहि ठिकाण सोडलें. तो आपल्या ध्येयसिद्धीसाठीं अधीर झाला होता. त्यासाठींच वणवण करीत होता. जगाच्या करुणेनें त्याचें समाधान घालवलें होतें. कोणतें साधन करावें, कसलें तप आचरावें, कोणता योग करावा, याविषयीं त्याला निश्चित काहींच समजत नव्हतें. जें करायचें, तें कितीहि खडतर असलें तरी तें करायची त्याची सिद्धता होती.

अशा स्थितींत तो फल्गु नदीच्या तीरीं आला. त्या नदीला त्या काळीं नैरंजन नदी असें नांव होतें. तिचें पाणी स्वच्छ होतें. दोन्ही तीरांवर प्रशस्त घाट बांधलेले होते. सगळीकडे घनदाट वृक्ष उभे होते. हिरवींगार कुरणें जागोजाग डोलत होतीं. त्या सर्व प्रदेशावर एक प्रकारचें सत्त्विक सौंदर्य विलसत होतें.

गौतमाला त्या ठिकाणीं प्रसन्न वाटलें. तिथें पांच योगी तप करीत बसलेले त्याला दिसले. तपानें शरीर झिजवलें, तिळातिळानें क्षीण केलें कीं मग ज्ञानाचा उदय होतो, अशी त्यांची श्रद्धा होती. गौतमाला वाटलें कीं, असें असेल तर फारच छान. तोहि मग एका ठिकाणीं आसन घालून बसला. त्यानें हळूहळू अन्न तोडायला सुरुवात केली. करतां करतां तो एका कणावर येऊन ठेपला. पुढें तो कणहि वर्ज केला. ज्या वृक्षाखालीं तो बसला होता त्यानें जर एखादें फळ अगदीं जवळ टाकलें तर तें तेवढेंच खायचें.

अन् याचा परिणाम काय झाला? गौतमाचा देह नुसता सांपळा बनला. डोळे खोल गेले. अवयवांत एखादी काडी उचलण्याइतकेंहि त्राण उरलें नाहीं. पण एवढें होऊनहि ज्ञानाच्या दृष्टीनें प्रगति शून्य. अशा प्रखर देहदंडनेनें ज्ञान मिळेल या गोष्टीवरचा त्याचा विश्वास उडाला. असलें तप हें व्यर्थ क्लेश देणारें आहे असें त्याला पक्कें बिंबलें. धर्मज्ञान व्हायचें तें ध्यानानेंच होऊं शकेल आणि ध्यान स्थिर होण्यासाठीं शरीराला सात्त्विक आहार देणें आवश्यक आहे, या निर्णयावर तो पोंचला.

आपल्या आसनावरून उठून त्यानें नैरंजन नदींत स्नान केलें. पण तो इतका कृश नि अशक्त झाला होता कीं, नदींतून वर

येतांना त्याचे हातपाय लटपटायला लागले. एवढ्यांत सुजाता नांवाची गोपकन्या हातीं दुधाची खीर घेऊन ती वनदेवतांना




गोपी बुद्धाला खीर देते

अर्पण करण्यासाठीं चालली होती. तिनें गौतमाची ती अवस्था पाहिली. तिची खात्री झाली कीं, हा पुरुष केवळ भुकेनें व्याकुळला आहे. तशीच पुढें येऊन तिनें ती खीर गौतमाला दिली. गौतम ती प्याला. काय दैवाची घटना पहा! एवढ्या मोठ्या राज्याचा युवराज आज गौळणीनें दिलेल्या बुटकुलेंभर खिरीवर जीव धरणार होता! त्या खिरीनें गौतमाच्या देहांत प्राण आला. अवयव टवटवीत झाले.

M 4203

मग त्यानें ठरवलें कीं, आजपासून हठयोग बंद. करायचें तें ध्यान आणि चिंतन. तें मात्र अखंडपणें करायचें. कोणताहि विक्षेप आला तरी तें सोडायचें नाहीं. या निश्चयानें तो उठला आणि तिथल्या अश्वत्थवृक्षाखालीं गेला. त्या वेळीं निर्धार हा एकच त्याचा सखा आणि सहकारी होता. तो आतां त्या वृक्षाखालीं बसून शेवटचा प्रयत्न करणार होता. थोडें ताजें, हिरवें गवत भूमीवर पसरून त्यानें आपलें वज्रासन तयार केलें. जरा, व्याधि आणि मृत्यु यांनीं जर्जर झालेल्या जगाला दुःखमुक्तीचें ज्ञानरसायन शोधून काढण्यासाठीं तो दयाघन महात्मा त्या आसनावर स्थिर झाला.



बोधिवृक्षस्थान

गौतमाचें ध्यान हळूहळू एकाग्र होऊं लागलें. अज्ञानाचा एकेक पडदा गळूं लागला. ज्ञानाची उषा फाकूं लागली. गौतम एकेका पावलानें अंतिम सत्याच्या जवळ जवळ जाऊं लागला. त्याचें चित्र अधिकाधिक उल्हसित होऊं लागलें.

त्यासरशीं विश्वांतल्या सगळ्या विरोधी शक्ती एकदम जागृत झाल्या. गौतमाला ज्ञान होऊं द्यायचें नाहीं, त्याआधींच त्याचा पराभव करायचा म्हणून त्यांनीं कंबर कसली. या सर्वांनीं माराला पुढें केलें. मार म्हणजे मदन. जो शंकराला तपापासून भ्रष्ट करायला निघाला होता तोच. त्यानें आपलें सगळें सैन्य एकत्र करून गौतमापुढें मायाजाल पसरलें. मंजुळ वाद्यें वाजूं लागलीं. स्वर्गातल्या अप्सरा नाचूं लागल्या. गौतमाचें चित्त विचलित व्हावें, समाधि भंगावी म्हणून मारानें अनेक कोवळीं अन् मोहक आयुधें त्याच्यावर फेकलीं.

पण गौतम या समाधिविघ्नांत पर्वतासारखा अचल राहिला. त्यानें माराला बजावलें, ‘ तुझा प्रयत्न निष्फळ आहे. मला मृत्यूचं भय घातलंस तरी त्याचा कांहीं उपयोग होणार नाहीं. श्रद्धा, प्रज्ञा आणि उत्साह यांनीं माझं हृदय तुडुंब भरलेलं आहे. ’ बिचारा मार! त्याला खट्टू होऊन परत फिरावें लागलें. गौतम हळूहळू ध्यानसागराचा तळठाव पाहूं लागला. त्याच्या सर्व आत्मशक्तींचा ओघ अंतिम सत्याकडे सुसाट धावूं लागला. अनंत कोटी ब्रह्मांडें त्याच्या दिव्य दृष्टीला दिसूं लागलीं. अनादि आणि अनंत असा हा प्रपंचपसारा त्याच्या दिव्य चक्षूंपुढें प्रगट झाला. आणि अशा स्थितींत वैशाखाची पौर्णिमा उगवली. चंद्र सकळ कळांनीं विलसूं लागला. रात्रीचा तिसरा प्रहर संपून ब्राह्ममुहूर्त लागला. आणि त्याच वेळीं अचानक गौतमाच्या हृदयमंदिरांत ज्ञानज्योत प्रगटली. त्याला ‘ बोधि ’ प्राप्त झाली. संसारदुःखाचें निदान आणि औषध हीं दोन्ही त्याला गवसलीं. इतके

दिवस गौतम होता तोच आतां ' बुद्ध ' झाला ! ज्या पिंपळाखालीं तो वज्रासन घालून बसला होता, तो पिंपळ बोधिवृक्ष म्हणून प्रख्यात झाला.

ज्ञानप्राप्ति झाल्यावरहि बुद्ध आणखी एक महिना त्या अश्वत्थवृक्षाच्या खालींच राहिला. तेवढ्या अवधींत त्यानें आपलें ज्ञान दृढ करून घेतलें. महिन्यानंतर तिथें एक भयंकर वादळ झालें. धूमधार पाऊस पडला. सगळीकडे पाणीच पाणी झालें. त्यावेळीं मुचलिंद नागानें आपलें वेटाळें करून बुद्धाला त्यावर बसवलें आणि आपलें सात फणांचें छत्र त्याच्या मस्तकावर धरलें. नंतर ब्रह्मा आणि इंद्र हे त्या ठिकाणीं प्रगट झाले. त्यांनीं बुद्धाची प्रार्थना केली.



भगवान् बुद्ध

" भगवन्, तुम्हांला जें ज्ञान प्राप्त झालें त्याचा जनांच्या उद्धारासाठीं जगभर प्रसार करा. "


आणि मग बुद्ध भगवान् ' धर्म-चक्रप्रवर्तन ' करण्यासाठीं संचाराला निघाला. त्याच्या ध्यानचिंतनांत त्याला चार आर्यसत्यें सांपडलीं. जन्म, जरा, व्याधि आणि मृत्यु हीं दुःखद आहेत हें पाहिलें आर्यसत्य. तृष्णा म्हणजे हांव हेंच त्या दुःखाचें कारण हें दुसरें आर्यसत्य. या तृष्णेचा त्याग केला पाहिजे, आसक्ति सोडली

पाहिजे हें तिसरें आर्यसत्य. आणि सम्यक्दृष्टि, सम्यक्संकल्प, सम्यक्कर्म इत्यादि अष्टांगिक मार्ग ; त्यानेंच दुःखाचा नाश होतो हें चौथें आर्यसत्य.

बुद्धानें पुढें सतत पंचेचाळीस वर्षे सर्वत्र संचार करून आपल्या ज्ञानाचा उपदेश केला. त्याच्याभोंवतीं अनेक शिष्य गोळा झाले. बुद्धानें धर्मसंघ प्रस्थापित केला. उदात्त आणि कल्याणमय असा धर्ममार्ग जनांना उपदेशून तो ८० वर्षांच्या आयुष्यानंतर निर्वाणाला गेला.

# नर्मदेश्वर

मध्यप्रदेशांतल्या जबलपूर जिल्ह्यांत एक गाव आहे. त्याचें नांव भेडाघाट. नांवावरूनच कळेल कीं, हें डोंगरांतलें गांव आहे. हें स्थान जबलपुरापासून १३ मैलावर आहे. मंडला जिल्ह्यांतल्या अमरकंटक पर्वतांतून उगम पावणारी नर्मदा नदी इथें संगमरवरी पाषाणाच्या टेकड्या कापीत, त्यांतून मार्ग काढीत पुढे जाते. इथूनच तिचा एक धबधबा खालीं कोसळतो. त्याचें नांव आहे धुवांधार. हा जिथें पडतो तिथून दुधाच्या फेसासारखे शुभ्र जलतुषार चौफेर उंच उडतात. त्यामुळें तिथें धूसर आणि विरल असा मेघच उतरला आहे असें वाटतें. नदीच्या दोन्ही तीरांवर संगमरवराच्या काळ्या–निळ्या, सफेत–लाल अशा विविध रंगांच्या शिळा पडलेल्या आहेत. नर्मदा ही गंगेप्रमाणेंच पुण्यपावन अशी मानलेली आहे.



नर्मदेश्वर मंदिर

भेडाघाटाजवळ ज्या अनेक सुळकेदार टेकड्या आहेत, त्यांपैकीं एका टेकडीवर एक मंदिर आहे. तेंच नर्मदेश्वराचें मंदिर. त्याच्या

आसपास काहीं ओबडधोबड अशा गुहाहि आहेत. या मंदिरांत शुभ्र पाषाणाचा एक नंदी उभा असून त्यावर शिव–पार्वती आरूढ आहेत. भाविक यात्रेकरू या ठिकाणीं येतात ते याच नर्मदेश्वराच्या दर्शनासाठीं. इथें कार्तिक पौर्णिमेला मोठी यात्रा भरते. नर्मदेश्वर हें नर्मदेच्या तीरावरचें एक महत्त्वाचें क्षेत्र आहे. पुढें दिलेली कथा हे क्षेत्र कसें आणि कोणीं निर्माण केलें त्यासंबंधींची आहे.

*　　　*　　　*

पुरातन काळची गोष्ट आहे. भेडाघाटाच्या संगमरवरी पहाडांतल्या एका गुहेंत एक साधु रहात होता. नर्मदा नदी पहाडांतले मोठमोठे खडक फोडून खळाळत, फेसाळत त्याच्या गुहेजवळूनच पायथ्याकडे झेप घेत होती. साधु रोज तिचें स्नान करी, स्तोत्रें म्हणे, वनांतलीं फळें जातां जातां मिळालीं तर तीं गोळा करी आणि मग दिवसभर शिवाचा नामजप करीत गुहेंत बसे. त्याच्या गुहेच्या तोंडाशीं कोणी गेलें तर त्याला ' ॐ नमः शिवाय ' हा मंत्र अंतर्भागांत घुमत असलेला ऐकायला येत असे.

साधु शिवभक्त होता आणि शिवाच्याच दर्शनासाठीं तप आचरीत बसला होता. त्या संगमरवरी पाषाणांसारखेंच त्याचें मन स्वच्छ आणि शुभ्र होतें. नर्मदेच्या प्रवाहाप्रमाणेंच त्याच्या भक्तीचा प्रवाह शंकराकडे अखंडपणें वहात होता. त्याला देहाची पर्वा नव्हती. कीर्तीची लालसा नव्हती. ऐश्वर्याची हांव नव्हती. आयुष्यांत त्याला एकच गोष्ट साध्य करायची होती आणि ती म्हणजे शिवदर्शन !

भक्त निष्ठेनें बसला कीं देवाचें आसन डळमळतें. भक्ताचा निर्धार दिसला कीं देवाला लगबग होते, शंकर तर या बाबतींत

अगदींच भोळा. त्यानें साधूला प्रसन्न व्हायचें ठरवलें. तो कैलास सोडून पृथ्वीवर आला आणि साधूपुढें उभा राहिला. गुहेच्या तोंडावर एवढा प्रकाशाचा झोत कुठला म्हणून साधु डोळे उघडतो



शिव–पार्वती साधूकडे येतात

तर समोर त्याचें साक्षात् आराध्य दैवत! एकटेंच नव्हे; तर बरोबर जगदंबा पार्वती.

"माझ्या भक्तराजा, ऊठ! मी आलों आहें."

साधु खडबडून उठला. त्यानें देवाचें तें रुपडें डोळेभर पाहून घेतलें. पाहतां पाहतां त्याचे डोळे भरले. कंठ सद्‌गदित झाला. 'महादेवा! तूं आलास........' एवढेच शब्द कसेबसे त्याच्या मुखांतून बाहेर पडले.

" होय. मी आलों. कृपावंत होऊन आलों. तुला काय हवं तें माग. " शंकर बोलला.

" तुझं दर्शन हाच माझा वर. मला दुसरं कांहीं नको. "

" मग माझं हें रूप तूं हृदयांत सांठवून घे. म्हणजे मी अतंर्धान पावेन. "

" नाहीं देवा ! असं करूं नको. मला एकट्याला तुझं दर्शन होऊन काम भागणार नाहीं. खालीं पायथ्याशीं जें गांव आहे त्यांतल्या प्रत्येक माणसाला तुझं दर्शन व्हायला हवं. हा आनंद मला एकट्याला उपभोगतां येत नाहीं. "

" सगळ्या गांवाला दर्शन द्यायचं म्हणजे— "

" नाहीं, नाहीं ! तें द्यायलाच हवं. या गांवचे लोक हे माझ्या सुखःदुःखांतले सोबती आहेत. त्यांचे माझ्यावर किती तरी उपकार आहेत. तेव्हां त्यांना वगळून तुझ्या दर्शनाचं भाग्य मीं एकट्यानंच लुटलं तर मी आपस्वार्थी ठरेन. तेव्हां तूं इथें थांब. मी गांवकऱ्यांना धांवत जाऊन बोलावून आणतों. आज सगळ्या गांवाला धन्य होऊं दे ! "

शिवानें त्या गोष्टीला संमति दिली. साधु आनंदानें उचंबळत खालीं गांवाकडे निघाला. काहीं पावलें गेल्यावर थबकून त्यानें पुन्हां देवाकडे तोंड वळवलें. 'देवा, थांबशीलना तोंवर ? का माझी पाठ वळतांच अदृश्य होशील ?' त्यानें डोळ्यांत करुणा आणून विचारलें. गांवचे लोक धांवत आले असते आणि त्यांची निराशा झाली असती तर ती गोष्ट त्याच्या जिव्हारीं लागणार होती. पण देवानें त्याला हसून अभिवचन दिलें.

"तूं परत येईपर्यंत मी इथून हालणार नाहीं. तूं निश्चितपणें जा!"

साधु विश्वासानें निघाला. घाटी उतरून दगडांवरून उड्या मारीत हरणाच्या वेगानें पळत सुटला. खालून नर्मदा खळाळत होती. वरून साधु धडपडत येत होता. त्याच्या कानांत शंकराचे ते शब्द घुमत होते. 'तूं परत येईपर्यंत मी इथून हालणार नाहीं.' त्याला वाटलें आपण परत गेलोंच नाहीं तर? तर काय होईल?

'तर देव तिथेंच अर्ध्या पहाडांत उभा राहील. केवळ एका घटकेसाठीं नव्हे; तर कायमचा, युगानुयुगें. एकटा नव्हे, तर जगन्माता पार्वतीसह. याच रूपांत, याच आकारांत. किती चांगलं होईल मग! याच गांवाला, याच पिढीला नव्हे; तर पुढच्या असंख्य पिढ्यांना, आणि अगणित भक्तांना त्याचं दर्शन घेऊन आयुष्याचं सार्थक करतां येईल. फक्त एकच गोष्ट. मी परत जातां कामा नये.'

हळूहळू हा विचार त्याच्या मनांत पक्का झाला. त्यानें परत जायचें नाहीं असें ठरवलें. परत जायचें नाहीं म्हणजे नर्मदेला आत्मसमर्पण करायचें. जीव लोटून द्यायचा. आणि त्यांत काय एवढें मोठेंसें? शिवदर्शन झालें. जन्माचें सार्थक झालें. आतां ह्या देहाचा लोभ कशाला? साधूनें खालीं पाहिलें. खालीं नर्मदा शुभ्र संगमरवरांवर आंपल्या शुभ्र लाटा आदळीत होती. त्यांतल्याच एका खडकावर तो उभा राहिला. त्यानें हात जोडले, 'नर्मदेऽऽ हर' असा एकच जयघोष केला आणि प्रवाहांत उडी

टाकली. आणि त्यासरशीं धप्प असा आवाज उठला. पाण्याचे काहीं तुषार चौफेर उडाले, वाहत्या धारेंत जरा गडबड झाली, चार दोन भोवरे गरगरले आणि तो साधु नर्मदेच्या उदरांत शांत झाला.



साधु नर्मदेंत उडी घेत आहे

भगवान् शंकर त्याच्या गुहेशीं मार्गप्रतीक्षा करीत उभा होता. घटका गेली, प्रहर गेला, तरी साधूचा पत्ता नाहीं. पार्वती अस्वस्थ झाली. ' केव्हां येणार हा साधु ' म्हणून चुळबुळ करूं लागली. शंकरानें अंतर्ज्ञानानें सगळा प्रकार जाणला आणि पार्वतीला म्हटलें.

" उमे, साधु येणार नाहीं. कधींहि येणार नाहीं. जिथून माणूस कधींहि परत येऊं शकत नाहीं, अशा वाटेनें तो निघून गेला. त्यानें नर्मदेंत समाधि घेतली. "

" अरेरे ! फार वाईट गोष्ट झाली. मग आतां आपण कैलासाला परत जाऊं. " पार्वतीनें म्हटलें. " तें खरं ; पण साधूला दिलेल्या वचनाची वाट काय ? तूं परत येईपर्यंत मी इथून हालणार नाहीं, "

असें मीं त्याला सांगितलें आहे. त्याचा आत्मा म्हणेल, 'देवानं फसवलं, वचनभंग केला.'

"पण त्याला अशा प्रकारें जलसमाधि घेण्याचं कारण तरी काय?"

"कारण जनतेच्या भावी पिढ्यांच्या कल्याणाची तळमळ! त्यांचा उद्धार व्हावा ही आकांक्षा! महात्मे जे असतात ते आपल्या आधीं जगाची काळजी करतात."

"मग आपल्याला कैलास कायमचा अंतरला काय?"

"नाहीं, उमे! मला या स्वरूपानं पृथ्वीतलावर कायमचं रहातां येणार नाहीं. वचन तर मोडूं नये, कैलास तर दुरावूं नये, अशी कांहीं तरी युक्ति केली पाहिजे."

शिव-पार्वती दोघेंहि कांहीं काळ विचारमग्न झालीं. समस्त भूतमात्राला केवळ भृकुटिभंगानें हाय हाय करायला लावील असा समर्थ शंकर चिंतेंत पडला. इच्छामात्रें विश्वाची घडी उलगडणारी आणि गुंडाळणारी आदिशक्ति पार्वती चिंतेंत पडली. त्या दोघांच्या-पेक्षां भक्ताचें बळ मोठें ठरलें. साधूनें त्यांना तिथें दोरीवांचून जखडून टाकलें.

थोड्या वेळानें शंकरानें चुटकी वाजवली. त्याला युक्ति सुचली. त्याची चर्या उजळली. तो नंदीवरून खालीं उतरला. त्याच्या पाठोपाठ पार्वतीहि खालीं आली. शंकरानें आपली कल्पना पार्वतीला सांगितली. तिला ती पसंत पडली. जवळच एक संगमरवरी शिळा पडली होती. ती दोघांनीं मिळून लोटीत, ढकलीत

एका प्रशस्त जागीं आणली. दोघांनींहि छन्नी, हातोडा घेतला. त्या शिळेंत नंदी खोदण्याचं काम सुरू झालें. एक बाजू पार्वतीनें



पाषाणनंदीची घडण

खोदली. दुसरी बाजू शंकरानें पुरी केली. एक धष्टपुष्ट, ढवळा नंदी उभा.झाला. अगदीं हुबेहूब खऱ्या नंदीची प्रतिमा.

" आतां पुढें काय ? " पार्वतीनें विचारलें.

" आतां या नंदीवर शिव आणि पार्वती या दोघांना बसवायचं. मी तुझ्यापुढें उभा आहेंच. माझी प्रतिमा तूं तयार कर अन् तुझी प्रतिमा मी बनवतों म्हणजे आपलं काम झालं. "

दोघांचीहि छन्नी त्या शुभ्र पाषाणावर आवाज करूं लागली. पाषाणाचे टवके उडूं लागले. मूर्ती आकार घेऊं लागल्या. हातासारखे.हात बनले. पायासारखे पाय बनले. पार्वतीच्या मुखावर

कोवळे भाव शिवानें प्रगट केले. शिवाची गंभीर मुद्रा पार्वतीनें कोरली. दोघांनीं आपापलें काम तत्परतेनें पुरें करून एकमेकांकडे पाहिलें. दोघांच्याहि मुद्रेवर प्रसन्न हास्य झळकलें.

एका प्रहरापूर्वी तिथें नसलेल्या शिव-पार्वतींच्या प्रतिमा तिथें सूर्याच्या प्रकाशांत झगमग करूं लागल्या. शिवानें त्या शिल्पाला वरदान दिलें.

" मी या पाषाणप्रतिमेंत पार्वतीसह सूक्ष्म रूपानें निवास करीन. साधूला दिलेल्या वचनाची पूर्ति मी अशा रीतीनें करीत आहें. जो कोणी त्या मूर्तीचें दर्शन घेईल त्याला साक्षात् शिव-दर्शनाचें फळ मिळेल आणि मुक्ति लाभेल!"

इतकी सर्व व्यवस्था करून भगवान् शंकर उमेसह कैलासाला निघून गेला.

# सोन्याची द्वारका

अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंती, पुरी आणि द्वारावती या भरतखंडांतल्या सात मोक्षदायक पुऱ्या आहेत. जगन्नाथाची पुरी पूर्व समुद्राच्या तीरावर तर द्वारकापुरी ही पश्चिम सागराच्या तीरावर आहे. प्राचीन काळीं ही आनर्त देशाची राजधानी होती. द्वारका हे एक गांव आणि बंदर आहे. बडोदें शहराच्या पश्चिमेस २७० मैलांवर तें येतें. प्रतिवर्षीं हजारों यात्रेकरू या ठिकाणीं द्वारकानाथजींच्या दर्शनासाठीं येत असतात. हें मंदिर गोमती नदीच्या तीरावर आहे. गोमती ही बहुतेक समुद्रमय झालेली आहे. सगळ्या द्वारकेंत द्वारकाधीशाचें म्हणजे श्रीकृष्णाचें मंदिर सर्वांत उंच आहे. त्याला एकावर एक सात मजले आहेत. त्याचा सोनेरी कळस तीन कोसांवरून दिसतो. मंदिरांतली द्वारकाधीशाची मूर्ति उच्चासनावर उभी आहे. द्वारका ही समुद्रांतल्या पश्चिमेकडील एका टोंकावर वसलेली असल्यामुळें इथें हवा क्षणोक्षणीं बदलत असते. द्वारकाधीशाच्या चार प्रहरांच्या चार पूजा होत असतात. तिथला दर्शनाचा सुखसोहळा अवर्णनीय असतो. मंदिराच्या आवारांत श्रीशंकराचार्यांचा मठ आहे. तिथेंच जवळ उग्रसेनाची गादी आहे.

बेटद्वारका म्हणतात ती आणखी निराळीच आहे. गोमती द्वारकेपासून ती दहा कोसांच्या अंतरावर आहे. त्या ठिकाणीं मचव्यांतून जावें लागतें. हें बेट समुद्रानें वेढलेलें आहे. बेटांत धर्मशाळा चांगल्या आहेत. रणछोडजी, त्रिकमलजी आणि कुशेश्वर यांचीं देवालयें आहेत. बेट खाऱ्या पाण्यानें वेढलेलें असलें तरी आंत गोडें पाणी भरपूर आहे. इथेंहि देवाचे सुखसोहळे आणि राजभोग थाटानें चालतात. इथें शंख, मोत्यांच्या शिंपा आणि गोपीचंदन या वस्तू चांगल्या मिळतात. हें क्षेत्र कोणत्या काळीं निर्माण झालें आणि कां निर्माण झालें त्याची मूळ कथा पुढे दिली आहे.

* * *

श्रीकृष्णानें मथुरेला कंसाच्या दरबारांत शिरून सर्व सभेच्या देखत त्याला यमलोकीं पाठवलें. एक दुष्ट दुर्जन निर्दळला म्हणून सगळ्या प्रजेला हर्ष झाला. कृष्णानें त्याची यथाविधि उत्तर क्रिया करवली. मग तो कंसाच्या बंदिशाळेंत गेला. तिथें वसुदेव आणि देवकी हे त्याचे आईवडील जखडून पडले होते. कृष्णानें त्या दोघांना मुक्त केलें. मायलेकरांची भेट झाली. देवकीनें आपल्या कुलदीपक पुत्राला हृदयाशीं धरलें. कृष्णानें मातापित्यांचें सांत्वन केलें. उग्रसेनहि बंदींतच होता. त्याला सोडवून कृष्णानें मथुरेच्या सिंहासनावर बसवलें. उग्रसेन म्हणाला.

" कृष्णा, कंसाला तूं मारलंस. सगळा पराक्रम तुझा. तेव्हां हें राज्यसुद्धा आतां तुझंच झालं आहे. तूंच सिंहासनावर बसून प्रजेचं पालन कर. "

त्यावर कृष्ण बोलला. 'मला राज्याची तृष्णा नाहीं. केवळ भूभारहरण हेंच माझं कार्य.' उग्रसेन राज्यारूढ होतांच सर्वत्र आनंदीआनंद झाला. सगळीकडे सुख-स्वास्थ्य निर्माण झालें. मग नंदादि गोपालांना वस्त्रालंकार देऊन कृष्णानें गौरवलें आणि त्यांची गोकुळांत पाठवणी केली. कृष्ण परत गोकुळांत गेला नाहीं. तो नव्या राज्याची घडी नीट बसवण्यासाठीं मथुरेंतच राहिला. पण कृष्णाला तेवढ्यानेंच स्वास्थ्य मिळायचें नव्हतें. अजून बऱ्याच उलाढाली व्हायच्या होत्या. घोरांदर रणें माजायचीं होतीं. आणि त्याची नांदी लवकरच सुरू झाली.

अस्ति आणि प्राप्ति या दोन कंसाच्या बायका. त्या दोघीहि रासधांच्याज मुली होत्या. श्रीकृष्णानें कंसाचा वध केल्यानंतर

त्यांची अवस्था कठीण झाली. मानमरातब··गेला. कोणी विचारीनासें झालें. त्या दोघीहि मोठ्या कावेबाज होत्या. त्यांनीं कृष्णाचा सूड घ्यायचें ठरवलें. एके दिवशीं त्या मथुरेंतून निसटल्या आणि बापाकडे पोंचल्या. जरासंधानें त्यांचें सांत्वन केलें. त्यावर त्या म्हणाल्या.



कंसाच्या स्त्रिया रडत आल्या आहेत

"आम्हांला नुसतं शाब्दिक सांत्वन नको. आमचं कपाळ फटफटीत झालं आहे. त्या कृष्णानं तुमच्या जावयाची हत्या

करून आमच्यावर ही दशा आणली. तुम्हांला या गोष्टीची चीड असेल, तुमच्या मुलींवर तुमचं खरंखुरं प्रेम असेल तर तुम्हीं त्या गवळी कृष्णाचा सूड घेतला पाहिजे. त्याचीं पाळंमुळं खणून काढलींत तरच आम्हीं समजूं कीं, आमचे वडील महाप्रतापी आहेत........"

त्या जहांबाज बायकांनीं आपल्या बापाचा स्वाभिमान चांगलाच चेतवला. जरासंध क्रोधानें पेटला. त्यानें केवळ राम-कृष्णांचाच नव्हे ; तर सगळ्या यादव वंशाचाच संहार करायचा निर्धार केला. तो लगेच सैन्य जमा करण्याच्या उद्योगाला लागला. जरासंध सम्राट् होता आणि त्याचे कितीतरी मांडलिक होते. त्या सर्वांना त्यानें हुकूम सोडले. ते आपापलें चतुरंग सैन्य घेऊन मगध देशांत जमा झाले. गजदळ, घोडदळ, रथदळ, पायदळ असा तेवीस अक्षौहिणी दळभार एकत्र झाला. आणि एवढ्या अवाढव्य सैन्यानिशीं जरासंधानें मथुरेवर चाल केली.


थोड्याच दिवसांत मथुरेला बळकट वेढा बसला. प्रलयकालीन सागराप्रमाणें तें सगळीकडे पसरलेलें सैन्य पाहून मथुरेंतले लोक गांगरून गेले. श्रीकृष्ण पुढें काय करतो याकडे सर्वांचे डोळे लागले. त्यानेंच आतां रक्षण केलें तर; न पेक्षां आपला अंतकाळ जवळ आला, असें लोकांना वाटलें.

पुढें काय करायचें याबद्दल कृष्णहि विचार करूं लागला. तो मनाशीं म्हणाला. 'पृथ्वीवर पाप भयंकर झालं आहे. राजे लोक मदांध होऊन प्रजेला पीडा देत आहेत. जरासंध हा अशा दुर्जनांचा मुकुटमणि. तोच आज आपल्यावर चालून आला आहे.

तेव्हां त्याचं पारिपत्य करणंच भाग आहे. मात्र जरासंधाला मारतां कामा नये. त्याचा पराभव करून त्याला सोडून द्यायचं, म्हणजे पुन्हा पुन्हा तो युद्धाचा उद्योग करील आणि त्यामुळें त्याच्याच कृत्यानें आपोआप भूमीचा भार हरण होईल.'

श्रीकृष्ण असा विचार करीत आहे तोंच आकाशांतून दोन रथ खालीं उतरले. ते सूर्यासारखे देदीप्यमान् होते आणि त्यांवर नानाप्रकारचीं शस्त्रास्त्रें लखलखत होतीं. त्यांना जोडलेल्या अबलख घोड्यांवर नजर ठरत नव्हती. त्या रथांवर सारथीहि होते आणि ते मोठ्या कौशल्यानें त्या घोड्यांना आवरून धरीत होते. ते सुसज्ज रथ पाहून श्रीकृष्ण बलरामाला म्हणाला.

"दादा, आपल्या अवतारकृत्याला स्वर्गातल्या देवांचंसुद्धां



राम-कृष्ण युद्धावर जात आहेत

साहाय्य आहे. त्यांनींच आपली अडचण दूर केली आहे. तेव्हां एका रथावर तूं चढ, दुसरा रथ मी घेतों. दादा, आतां परचक्र

पिटाळून स्वजनांचं संरक्षण करणं ही जबाबदारी सर्वस्वीं तुझ्यावर आहे."

कृष्णाच्या या प्रशंसेला बलरामानें मान तुकवली आणि चिलखत चढवलें. दोघेहि रथारूढ होऊन यादवसैन्यासह नगरांतून बाहेर पडले. उभय सैन्यें एकमेकांना भिडलीं. शंख, कर्णे, कहाळा, मांदळ, भेरी, इत्यादि रणवाद्यें वाजूं लागलीं. राम-कृष्णांनीं आपापले रथ पालाणले ते सरळ नेऊन जरासंधापुढें उभे केले. कृष्णाला समोर उभा असलेला पाहून जरासंधाचें पित्त खवळलें. तो बोलला.

"कृष्णा! तूं कालचं पोर. तुझ्याशीं काय लढायचं! त्यांत मला भूषण नाहीं. तुझा थोरला भाऊ बलराम पुढें उभा रहात असेल तर मी त्याच्याशीं चार हात करीन. तूं महाघातकी. आपल्या मामाला मारणारा. मला तुझं तोंडसुद्धा पहायचं नाहीं."

कृष्ण म्हणाला. 'ठीक आहे. माझ्याशीं नको असेल, तर माझ्या दादाशीं लढ.' आणि मग लगेच त्या दोघांच्या युद्धाला तोंड लागलें. बलराम आणि जरासंध. दोघेहि अतुलप्रतापी रण-धुरंधर! दोघांनींहि शर्थ चालविली. क्षणांत हा पडतो असें वाटायचें तर क्षणांत तो. दोघेहि देहमान विसरून देमार घेमार करूं लागले.

त्या दोघांचें युद्ध असें हातघाईवर आलें असतां इकडे श्रीकृष्णानें आणि यादव सैन्यानें जरासंधाचा दळभार संहारला. सगळें सैन्य आटलें. कित्येक मेले. कित्येक घायाळ झाले. कित्येक पळाले. रणभूमि ओसाड दिसूं लागली. एवढ्यांत इकडे बलरामाचा जोर वाढला. त्यानें जरासंधाशीं अगदीं लगट करून त्याच्यावर

वरुणपाश टाकला. त्या पाशानें जरासंधाला खालीं ओढून बलराम त्याचा शिरच्छेद करणार, एवढ्यांत श्रीकृष्ण तिथें धांवून आला.

" दादा दादा ! पाश आवर. याला जिवें मारूं नको. याचं सगळं सैन्य आतां खलास झालं आहे. पंख तुटलेल्या गरुडासारखी आतां याची अवस्था आहे. हा आतां आपलं कांहीं सुद्धा वांकडं करूं शकत नाहीं. याला तूं सोडून दे. "



बलराम जरासंधावर पाश टाकीत आहे.

बलरामानें कृष्णाचें म्हणणें मान्य केलें. जरासंध मोकळा झाला आणि अपमानित होऊन आपल्या राजधानींत गेला. राम-

कृष्ण विजयवाद्यें वाजवीत रणभूमीवरून मथुरेंत परतले. सगळ्या प्रजेनें त्यांचा जयजयकार केला. नगरांतल्या स्त्रियांनीं गच्चींत गर्दी करून त्यांच्यावर लाह्या-फुलें उधळलीं. उग्रसेन राजानें त्यांचें दरबारी स्वागत केलें. लढाईंत मिळालेलीं शस्त्रास्त्रें आणि वीरांचीं बहुमूल्य भूषणें श्रीकृष्णानें उग्रसेनाच्या चरणीं अर्पण केलीं. उग्रसेन राम-कृष्णांवर प्रसन्न झाला. हे दोघे अलौकिक पुरुष आपल्या पाठीशीं सदैव उभे आहेत म्हणूनच आपलें राज्य टिकेल, वाढेल असें तो मानूं लागला.

जरासंध परत गेला ; पण तो स्वस्थ बसला नाहीं. त्याचा आत्मा तडफडत होता. त्याला झालेल्या पराभवाच्या सुया बोंचत होत्या. अन्नपाणी गोड लागत नव्हतें. झोपेनें तर त्याच्याशीं गट्टीच तोडली होती. आणि तशांत त्याला डंख मारायला त्याच्या त्या दोघी मुली होत्याच माहेरीं. त्यामुळें जरासंधानें पुन्हा सैन्य जमवलें. पुरेशी सिद्धता केली. आणि पुन्हा मथुरेवर धाड घातली. पण परिणाम काय तर पराभव. प्रत्येक वेळीं अपयशानें जळफळत, सुस्कारे गाळीत परत यायचें.

असें एकदा, दोनदा, नव्हे; क्रमानें सतरा वेळा झालें. प्रत्येक वेळीं यादवांचा तुरा वर. जयश्री त्यांच्या वांट्याला. पण युद्ध म्हटलें, कीं त्यांत उभय पक्षांची हानि ठरलेलीच. मग जय होवो वा पराजय होवो. यादवांना विजयाचें समाधान मिळालें; पण त्यांचें नुकसानहि खूपच झालें. सगळी प्रजा हवालदिल झाली. मथुरेंत कसलेंच त्राण उरलें नाहीं. तें नगर जणूं खिळखिळें झालें.

मिळालेला विजय साजरा करण्याइतकासुद्धा उत्साह कोणाच्या अंगांत उरला नाहीं. मथुरेवर अवकळाच पसरली.

श्रीकृष्ण या गोष्टीचा गंभीरपणें विचार करूं लागला. सतरा वेळां पराभूत होऊनहि जरासंध अठरावी स्वारी करणार नाहीं याची खात्री नव्हती. जरासंध सूडाला पेटला आहे, पुरता वेडा झाला आहे, हें श्रीकृष्णाला कळून चुकलें होतें आणि तसें झालें तर यादवांची स्थिति कठीण होती. अशा विवंचनेंत श्रीकृष्ण असतांनाच मथुरेवर एक नवेंच अरिष्ट येऊन कोसळलें.

दक्षिणेचा कालयवन यादवांचा वैरी होता. त्यांच्या नाशाला तो बोक्यासारखा टपून बसला होता. जरासंधाशीं सतरा वेळा युद्ध करून यादवांची कणीक मऊ झाली आहे, त्यांची युद्धसामग्रीहि संपुष्टांत आली आहे, हें जेव्हां त्याला कळलें, तेव्हां त्यानें ठरवलें कीं, यादवांचा कांटा काढायला हीच वेळ चांगली आहे. त्यानें ताज्या दमाचें तीन कोटी सैन्य उभें केलें आणि मथुरेला गराडा दिला. यादव युद्धासाठीं बाहेर आले तर रणभूमीवर त्यांना भिडायचें आणि ते बाहेर आले नाहींत तर सरळ आंत घुसून कंदन करायचें असा त्यानें बेत ठरवला.

या संकटानें राम-कृष्ण चिंतेंत पडले. एवढ्यांत आणखी बातमी आली कीं, जरासंध पुन्हां नवा सैन्यसमुदाय घेऊन अठराव्या स्वारीला येत आहे. दोघेहि यादवांचे शत्रू. ते एक होणार, आगीला वारा भेटणार, हें उघड होतें. दोघे दोन बाजूंनीं शस्त्र-वर्षाव करूं लागले कीं मधें यादवांची दामटी वळणार. हेंहि सत्य होतें. मग म्हातारीं कोतारीं चिरडतील, पोरें मरतील, स्त्रियांची विटंबना

होईल, उरलेसुरले तरुण वीर युद्धांत खपतील आणि सरतेशेवटीं पृथ्वीवर यादवांची नावनिशाणीसुद्धा रहाणार नाहीं हें भविष्य श्रीकृष्णाला उघड दिसूं लागलें.

पण श्रीकृष्ण हा महाधोरणी होता, प्रखर पराक्रमी होता, लीलानाटकी होता आणि जगाचा सूत्रचालक होता. एवढें दुहेरी संकट ओढवलें तरी मथुरेंतली जनता त्याच्या सत्तेवर आणि कृपेवर निर्भर होती. कृष्णपरमात्मा कशाहि स्थितींत आपल्याला तारील, यावर त्यांचा दृढविश्वास होता.

मग श्रीकृष्णानें कसला तरी निश्चय मनाशीं ठरवून विश्वकर्म्याला पाचारण केलें. तो तात्काळ पुढें उभा झाला. देव त्याला बोलला.

"तूं तावडतोब पश्चिम सागरावर जा. तिथें समुद्रांत बेटासारखी एक भव्य तटबंदीची सुंदर नगरी निर्माण कर. वेळ न लागतां हें काम झालं पाहिजे."

विश्वकर्म्यानें ती आज्ञा शिरसा वंद्य केली. आपल्या हाताखालीं अनेक स्थपती, शिल्पकार आणि गवंडी, सुतार इत्यादि कारुनारू अशा लोकांचा मोठा समुदाय घेऊन तो पश्चिम सागराच्या तीरावर आला. प्रथम समुद्रांत भराव घालून त्यानें विस्तीर्ण भूमि निर्माण करून घेतली. मग तिच्या कडेनें तट आणि बुरूज उभारले. बारा योजनें लांब-रुंद एवढा तो प्राकार झाला. चार मोठे राजमार्ग बनले. त्यांतून आडव्या उभ्या पेठा बनल्या. मोठमोठ्या चुनेगच्ची हवेल्या उभारल्या गेल्या. पेठापेठांतून देवतांचीं मंदिरें तयार झालीं. त्यांवर सोन्याचे उंच कळस लखलखूं लागले. श्रीकृष्णासाठीं

अनेक चौकांचा विशाल आणि सुंदर राजवाडा उभा झाला. त्यावर रत्नजडित कलाकुसर मांडण्यांत आली. सोन्याच्या भिंती. स्फटिकांच्या गच्च्या. त्यांवर चांदणें पसरलें कीं त्या शोभेपुढें स्वर्ग फिका वाटावा.

नगररचना पुरी झाल्यावर विश्वकर्म्यानें लोकांच्या आरामासाठीं जागोजाग विश्रामगृहें बांधलीं. ठायीं ठायीं उपवनें तयार केलीं. सगळीकडे विपुल पाणी खेळवलें. मग अश्वशाळा, गजशाळा निर्मिल्या. देवेंद्रानें तिथल्या बागेंत कल्पवृक्ष आणून लावला. वरुणानें शुभ्रवर्णाचे श्यामकर्ण वारू आणून तिथल्या अश्वशाळेंत बांधले. कुबेरानें अपरिमित संपत्ति आणून तिथें ओतली. बहुतेक देवांनीं आपापल्या जवळच्या सुंदर चित्ताकर्षक वस्तू त्या नगरींत आणून मांडल्या. जें जें सुबक आणि कलापूर्ण तें तें त्या नगरींत दाखल झालें. धनधान्य, वस्त्रप्रावर्ण, सोनें-रुपें, माणकें, मोत्यें, या सर्वांची तिथें समृद्धि झाली.

अशी ही अभिनव नगरी निर्माण करून विश्वकर्म्यानें श्रीकृष्णाला वर्दी दिली. श्रीकृष्ण त्याच्यावर प्रसन्न झाला. त्यानें रातोरात मथुरेंतल्या प्रजेला गुप्त मार्गानें काढून त्या नगरींत पोंचवलें. कृष्णाला ती नगरी अतिशय आवडली. जणुं तिच्या रूपानें अमरपुरीच खालीं उतरली होती. कृष्णानें द्वारका असें तिचें नांव ठेवलें. मथुरेहून तिथें आलेल्या आबालवृद्धांना द्वारकेची विलक्षण अपूर्वाई वाटली. वर निळें आभाळ. सभोंवतीं निळा समुद्र. त्यावर दुधासारख्या लाटा. आणि त्यांत एखादें सहस्रदळ कमळ उमलावें तशी ती सोन्याची द्वारका. तिथें रहायला गेलेल्या लोकांच्या आनंदाला त्या समुद्राहूनहि अधिक भरती आली.

सगळ्या यादव मंडळीची यथायोग्य सोय लागल्यावर श्रीकृष्णानें बलरामाला सांगितलें. 'दादा, तूं इथें राहून द्वारकेचं रक्षण कर. मी परत मथुरेला जातों. त्या दुष्ट कालयवनाचा समाचार घेतल्यावांचून मला स्वस्थता लाभणार नाहीं.'

श्रीकृष्ण परत तिथून मथुरेला आला. मग एकटाच बाहेर पडला. त्यानें कालयवनापुढून पळून जाण्याचें नाटक केलें. कालयवन त्याच्या पाठीस लागला. त्याचें मरण आपल्या हातून नसून तें मुचकुंदाकडून आहे हें कृष्णाला ठाऊक होतें. तो त्याला झुकवीत मुचकुंद झोंपला होता त्या गुहेंत घेऊन आला आणि स्वतः लपून राहिला. कालयवनानें झोपलेल्या मुचकुंदाला जागें केलें आणि तो त्याच्या क्रुद्ध दृष्टीनें जळून भस्म झाला. इकडे मथुरेंत कोणीहि यादव उरला नाहीं. सगळे आपल्याला भिऊन पसार झाले या खुषींत जरासंधहि आपल्या राज्यांत निघून गेला.

एवढें सर्व राजकारण साधून श्रीकृष्ण पुन्हां द्वारकेंत आला. त्यापुढें द्वारका हीच त्यानें यादवांची राजधानी ठरवली. द्वारकेंत सदैव सुख समाधान नांदूं लागलें. मग श्रीकृष्णाचा रुक्मिणीशीं विवाह झाला. इतरहि अनेक स्त्रिया त्यानें वरल्या. त्याचा प्रपंच फार मोठा वाढला. मुलें, नातवंडें, लेकी, सुना यांनीं सगळी द्वारका गजबजून गेली. त्याचा गृहस्थाश्रम उत्तम झाला. देव तिथें वास्तव्य करतो म्हणून मग ऋषि, मुनि, योगी, सिद्ध, भक्त या सर्वांची द्वारकेकडे रीघ सुरू झाली. आणि त्या दिवसापासून द्वारका हें श्रीहरीच्या वास्तव्यानें पुनीत आणि मंगल झालेलें महान् पुण्यक्षेत्र बनलें.

# बार्शी-भगवान

सोलापूर जिल्ह्यांत महाराष्ट्राचें एक फार मोठें भक्तिक्षेत्र वसलें आहे. पंढरपूर हें त्याचें नांव. पण त्याच सोलापूर जिल्ह्यांतलें आणखी एक प्राचीन क्षेत्र कोणतें तें सांगा असें जर म्हटलें तर मात्र पुष्कळसे लोक विचारांत पडतील. बार्शीचें नांव कांहीं त्यांना आठवणार नाहीं.

पण बार्शी हेंहि एक प्राचीन भक्तिक्षेत्र आहे, हें आपण जाणायला हवें. मराठींत द्वादशीला 'बारस' असें नांव आहे. उदाहरणार्थ, 'वसुबारस' म्हणजे आश्विन कृष्णपक्षांतली गोवत्सद्वादशी.


श्रीमद्भागवतांत अंबरीष राजाची जी कथा आहे तिचा या बारशीशीं संबंध आहे असें दंतकथा सांगते. अंबरीष राजा हा भगवंताचा भक्त होता. त्याला साधन द्वादशीचें व्रत होतें आणि याच ठिकाणीं भगवानाची स्थापना करून तो त्याची भक्ति करीत होता, अशी महाराष्ट्रांत परंपरागत समजूत आहे.

बार्शी हें एक तालुक्याचें ठिकाण असून व्यापाराचें केंद्र आहे. इथें कापड आणि शेंगदाणा यांच्या गिरण्याहि आहेत. फार प्राचीन काळीं इथें अंबरीषानें द्वादशीचें पारणें कसें फेडलें, ती कथा पुढें दिली आहे.

*　　*　　*

आज कार्तिक मासांतली द्वादशी होती. नुकताच सूर्योदय झाला होता. अंबरीष राजाच्या राजवाड्यांत चौघडे, सनया वाजत होत्या. राजा भगवंताची महापूजा करीत होता. ऋषिमुनी मंत्र सांगत होते. वस्त्रें, भूषणें, गंधपुष्प, धूपदीप; इत्यादि राजोपचार भगवंताला यथाविधि अर्पिले जात होते. राजाचें अंतःकरण भक्तिभावानें दाटलें होतें.

अंबरीष राजा परमभक्त होता. भगवान् श्रीहरि हें त्याचें उपास्य दैवत होतें. एकादशीला ' हरिदिनी ' अशी संज्ञा आहे. तिचें व्रत तो विधिपूर्वक आचरीत होता. त्यानिमित्त तो तीन रात्रीं उपोषण करी आणि द्वादशीला ती तिथि संपायच्या आंत इष्टमित्र आणि ब्राह्मण यांना पंक्तीला घेऊन पारणें करी. आजहि त्याचप्रमाणें सर्व कार्यक्रम व्हायचा होता.



अंबरीषाची विष्णुपूजा

पूजा समाप्त झाली. मग ब्राह्मणांचें पूजन झालें. राजानें त्यांना महावस्त्रें आणि सवत्स गायी दान दिल्या. एवढ्यांत पंक्ती वाढून तयार झाल्या. ब्राह्मण त्रिसुपर्ण पुरें करून जेवायला बसले. राजानें आग्रह करून त्यांना पक्वान्नें वाढलीं. ' अन्नदाता सुखी भव '

म्हणून ब्राह्मण उठले. मग अंबरीषानें स्वतःच्या पारण्यासाठीं ब्राह्मणांची अनुज्ञा घेतली. तो पानावर बसला. पण आतां आपोष्णी घेणार एवढ्यांत दुर्वासमुनि तिथें आला.

राजा लगबगीनें उठला. त्यानें अतिथीचें स्वागत केलें. मग 'भोजनाला चलावें' म्हणून प्रार्थना केली. दुर्वास म्हणाला. 'ठीक आहे. भोजनाला येतों. पण त्या आधीं मला नदीवर जाऊन माझं नित्यकर्म उरकूं दे.' राजा बोलला, 'आपल्या इच्छेप्रमाणें होऊं द्या.'

दुर्वासमुनि नदीवर गेला आणि स्नान करून तिथेंच जपाला बसला. त्याला वेळेचें भान उरलें नाहीं. पण अंबरीषाचें लक्ष मात्र बुडणाऱ्या प्रत्येक घटकेकडे लागलें होतें. आतां अर्ध्या घटकेंत द्वादशी संपणार होती. त्याच्या आंत पारणें झालें नाहीं, तर व्रताचा एवढा खटाटोप फुकट जाणार होता. गृहस्थधर्माला जागायचें तर दुर्वासाला पंक्तीला घेतल्यावांचून त्याला भोजन करणें शक्य नव्हतें. आणि व्रताला जागायचें तर ताबडतोब अन्नग्रहण करणें भाग होतें. एक साधलें तर दुसरें बिघडतें अशी परिस्थिति निर्माण झाली होती. इकडे आड अन् तिकडे विहीर !

राजानें आपलें हें धर्मसंकट तिथें जमलेल्या धर्मशास्त्र्यांना सांगितलें आणि निर्णय मागितला. त्यांनीं विचार करून तोड सुचविली. 'राजा, अतिथीला सोडून भोजन करणें अप्रशस्त. तेव्हा तूं फक्त देवाचें तीर्थ घे. तीर्थानें उपास सुटतो; पण जेवल्या-सारखें मात्र होत नाहीं.'

‘ जशी तुमची आज्ञा ’ म्हणून राजानें भगवंताचें तीर्थ ग्रहण केलें आणि द्वादशी साधली. मग तो दुर्वासाची वाट पहात बसला. दुर्वासाला योगसामर्थ्यानें हा प्रकार कळला. तो एकदम खवळून उठला आणि संतापत, पाय आपटीत राजाकडे आला.

“ अधर्म ! महान् अधर्म !! राजा, अतिथीला भोजनाचं निमंत्रण दिलंस आणि त्याच्या आधीं अन्नग्रहण केलंस, हें तुला शोभलं का ? ”

“ नाहीं मुनिवर्य ! मी अन्नाला शिवलोंहि नाहीं. तुमचीच वाट पहात बसलों आहें. द्वादशी चुकूं नये म्हणून मीं फक्त देवाचं तीर्थ तेवढं घेतलं.”

“ तीर्थ घेणं म्हणजेच भोजन करणं. मी तुझा हा अपराध सहन करणार नाहीं. आतां मी जें शासन देईन, तें भोगायला सिद्ध हो.”

दुर्वास लालीलाल झाला. त्यानें आपली एक जटा उपटली आणि भूमीवर आदळली. त्यासरशीं एक कृत्या उत्पन्न झाली. काळीकभिन्न आणि अक्राळविक्राळ ! दुर्वासानें तिला आज्ञा केली.

“ या अधर्मी राजाला खाऊन टाक.”

राजा गोठल्यासारखा स्तब्ध झाला. सगळे ऋषिमुनी आश्चर्यानें पाहूं लागले. राणीवशात् भयाचें आक्रंदन उठलें. पोरेंबाळें किंचाळलीं. भालदार चोपदार गर्भगळित झाले.

आपल्या मुखांतून आगीचे लोळ सोडीत ती कृत्या अंबरीषाच्या अंगावर धावली. अंबरीष एक पाऊलसुद्धा मागें सरकला नाहीं. ‘ मी पापी असेन तर मरेन. अन्यथा देव माझं रक्षण करीलच ’ अशी त्याची दृढ श्रद्धा होती.

आणि झालेंहि तसेंच. ती कृत्या अंबरीषाच्या शरीराला स्पर्श करणार एवढ्यांत भगवंताचें सुदर्शनचक्र एकदम लखलखलें आणि



दुर्वास कृत्या उत्पन्न करतो

त्यानें त्या काळ्या कृत्येचें एका क्षणांत भस्म केलें. दुर्वास खजील झाला. ' आ ' वासून बघतच राहिला.

पण तें सुदर्शन कृत्येला जाळून अदृश्य झालें नाहीं. तें झगमगत दुर्वासाच्या रोखानें पुढें जाऊं लागलें. दुर्वास चार पावलें मागें सरला. चक्र चार पावलें पुढें झालें. तो उजवीकडे वळला कीं तें उजवें वळे अन् डावीकडे वळला कीं आपणहि डावें होई. लोक सगळे पहाताहेत, हसताहेत अन् दुर्वासाला मात्र घाम फुटला आहे.

कांहीं केल्या तें चक्र पाठ सोडीना. तेव्हां दुर्वासानें तोंड वळवून धूम ठोकली. धाप लागेपर्यंत पळावें अन् जरा थबकून मागें पहावें तों चक्र पाठीशीं आहेच. तो अरण्यांत शिरला, गुहेंत शिरला, डोंगरावर चढला, नदींत बुडला तरी चक्र कांहीं मागचें सुटेना. शेवटीं आणखी एकदा धूम ठोकून त्यानें सत्यलोक गांठला. सत्यलोकाचा स्वामी ब्रह्मदेव. त्याला शरण जाऊन दुर्वास म्हणाला.

" ब्रह्मन्, स्वयंभू विधात्या, मला हें विष्णुचक्र ग्रासायला उठलं आहे. तूं माझं रक्षण कर. मला वांचव."

त्यावर ब्रह्मदेव बोलला.

" दुर्वासा, तें अशक्य आहे. हें श्रीविष्णूचें चक्र आहे. त्यानं कल्पांत करायचं मनांत आणलं तर नुसत्या भृकुटिभंगानं तो संपूर्ण विश्वासह माझ्या सत्यलोकाचा नाश करील. मी आणि इतर सर्व प्रजापति हे त्याचे आज्ञाधारक आहों. त्याच्या इच्छेला विरोध करण्याचं सामर्थ्य आमच्या अंगीं नाहीं. तेव्हां तूं आपला दुसरीकडे जा."

दुर्वास हताश होऊन कैलासाकडे पळत सुटला. त्याला वाटलें कीं, ब्रह्मा नाहीं तर महादेव तरी आपल्याला पाठीशीं घालील. पण तिथेंहि मागचाच अनुभव आला. रुद्रानें त्याला स्पष्ट सांगितलें.

" मला नमस्कार घालून कांहींहि फायदा नाहीं. मी प्रलयंकर महाकाळ असलों तरी त्या विश्वव्यापकाच्या मायेंत गुरफटलेला आहें. तेव्हां तूं आपला वैकुंठीं जाऊन सरळ श्रीहरीचेच पाय धर. चक्र त्याचं आहे; तोच तें शांत करील."

दुर्वासाला जें नको होतें तेंच करायची वेळ आली. जीव जगवण्याच्या आशेनें गेला तिथवर. चक्रानेंहि त्याचा पाठलाग सोडला नाहीं. भगवंताच्या दरबारांत शिरतां शिरतांच त्यानें आक्रोश मांडला.

" भगवन्, तुमचं चक्र माझ्या पाठीशीं लागलं आहे. मला जाळूं पहात आहे. त्याला आवरा. माझा जीव वांचवा. "

दुर्वासानें श्रीविष्णूच्या पायांवर लोळण घेतली. देवानें त्याला उठवलें, आसनावर बसा म्हटलें तरी त्याचा आक्रोश थांबेना.

" हे अच्युता, अनंता, विश्वपालका ! मी चुकलों. तुझ्या भक्ताचा छळ केला. त्याचा कांहींहि अपराध नसतांना केवळ माझी प्रतिष्ठा वाढवण्यासाठीं मीं त्याच्यावर कृत्या घातली. आतां मला त्याचा पश्चात्ताप होतो आहे. वांचवा ; प्रभो वांचवा.... ! "

घनसांवळा श्रीरंग हसला अन् म्हणाला. ' दुर्वासमुने, मला तुझी करुणा येते. पण मी तरी काय करूं ! मी सर्वतंत्रस्वतंत्र खरा ; पण भक्तांचा किंकर. ते धनी अन् मी चाकर. '

" देवा, असं कां बोलतोस ? " दुर्वास काकुळती आला.


" खरं तेंच बोलतों. जे मजकडे कधींच कांहींसुद्धा मागत नाहींत, सायुज्यमुक्तीसारखं भरघोस दान घेऊन त्यांच्या दारीं गेलों तरी जे हात पुढें करीत नाहींत अन् इतकें असूनहि जे मला नित्य भजतात, माझी पूजा करतात, मला आळवतात, त्यांचा मी धनी नव्हे ; तर दास आहें. त्याचा ऋणको आहें. "

" पण देवा, हें सुदर्शन चक्र तरी तुझंच आहे ना? मग तेवढं तरी आवर."

" तेंहि शक्य नाहीं. अंबरीष हा माझा एकांतभक्त. तो माझा जीवींचा सोयरा. माझ्या अर्धांगी लक्ष्मीपेक्षांहि मी त्याला मानतों. हें चक्र मीं त्याच्या रक्षणासाठीं पाठवलं होतं. आतां त्याच्यावर माझी सत्ता नाहीं. माझ्या आज्ञेनें ते थांबायचं नाहीं. अंबरीषाची आज्ञा झाली तरच तें शमेल. दुर्वासमुने, मला तुझी दया येते; पण काय करूं? तूं आपला त्या अंबरीषालाच शरण जा कसा! तोच तुझा रक्षणकर्ता होईल."

' भगवंता, चांगला उपदेश करतोस. मीं ज्याच्यावर कृत्या घातली, त्याच्याचकडे परत गेलों तर तो म्हणेल, ' बरा सांपडला; आतां सूड घेतों याचा. त्यापेक्षां तूंच मला लोटून दे...."

" मुने, असं म्हणूं नकोस. तूं जा त्याच्याकडे. माझ्या भक्ताचा एकदा अनुभव घे."



सुदर्शन दुर्वासामागें

' बरं देवा' म्हणून दुर्वास वैकुंठांतून अडमडत खालीं येऊं लागला. तरीहि सुदर्शन चक्रानें त्याचा मागोवा सोडला नाहींच. दुर्वासाचे पाय मृत्युलोकाला लागले. आतां त्याला धावण्याची शक्ति

उरली नव्हती. शरीर थकलें होतें, मन खचलें होतें. आपण भलतीच गोष्ट करून बसलों आणि स्वत:वर अनर्थ ओढवून घेतला, हा पश्चात्ताप सुदर्शन चक्राहूनहि त्याला अधिक जाळूं लागला. कसाबसा तो अंबरीषाकडे आला आणि त्यानें राजाच्या पायावर देह लोटून दिला.

" राजा, चुकलों. क्षमा कर. हें माझ्या पाठीमागचं चक्र थांबव. "

अंबरीषानें त्याला उठवतां उठवतांच चक्राची प्रार्थना केली आणि तें एका क्षणांत शांत होऊन अदृश्य झालें. दुर्वासानें सुटकेचा सुस्कारा सोडला. त्याच्या प्राणावरचें अरिष्ट टळलें. त्रिभुवन हिंडून तो आला होता आणि आतां त्याला अंबरीषाची योग्यता कळली होती. तो राजाला अनेक आशीर्वाद देऊन म्हणाला.

" विष्णुदासांचा मोठेपणा आज माझ्या प्रत्ययाला आला. वैकुंठाधिपति श्रीहरि तुमचा दास कां, तेंहि कळलं. मी तपाच्या बळावर मातलों आणि तूं भक्तीच्या बळावर नम्र झालास, हा तुझ्यामाझ्यांतला फरक. राजा, तूं तीर्थरूप आहेस. केवळ दर्शनानें पुनीत करणारा आहेस......... "

त्यावर अंबरीष मोठ्या काकुळतीनें म्हणाला.

" ब्रह्मन् ! अशी प्रशंसा करून मला लाजवूं नका. मी तुम्हां तपोधनांचा किंकर आहें. तुमच्या कृपेचा याचक आहें. मुने, आतां भोजनाला चला. मला पंक्तिलाभ देऊन कृतार्थ करा. "

" म्हणजे, तूं अजून जेवला नाहींस ? एक वर्ष झालं माझ्या पळापळीला. अन् अजून तूं उपाशीच आहेस ? "

" होय मुनिराज ! तुम्हांला मीं निमंत्रण दिलं होतं. तेव्हां अतिथीला टाकून कसा जेवूं ? "

" अरेरे ! केवढा मी दुष्ट, चांडाळ ! तुझ्यासारख्या सात्त्विक भागवताला मीं एक वर्ष उपाशी ठेवलं. क्रोध माझ्या स्वाधीन राहिला नाहीं. मी क्रोधाच्या आहारीं गेलों. उठतां बसतां क्रोध. नको असलेला अभिमान. यानंच मला नाडलं. माझा दुर्लौकिक त्रिखंड गाजतो आहे ; पण तरीहि मी शहाणा होत नाहीं. सत्त्वशील राजा ! यापुढें तुझ्या कृपेनं तरी माझा अहंभाव गळूं दे. क्रोध जळूं दे. "

अंबरीषानें मग त्याचें सांत्वन केलें आणि मग त्याला मिष्टान्न जेवूं घातलें. त्याच्याच पंक्तीला एका वर्षानंतर अंबरीष राजाचा उपास फिटला. भोजन झाल्यावर तृप्त, संतुष्ट अंतःकरणानें दुर्वासमुनि आशिर्वाद बोलला.

" तूं मजवर अनुग्रह केलास. तुझं हें प्रशंसनीय कर्म स्वर्गांत देवांगना वारंवार गातील. ही भूमि तुझ्या परमपवित्र कीर्तीची ग्वाही देत राहील ! "